सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ०१ मे २०२४ | वर्ष दुसरे | अंक ४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

# 'मावळत्या सूर्याच्या साक्षी'ने शपथ घेणाऱ्यांना शिक्षा देण्याची वेळ आलीय!

## पंतप्रधान मोदींची शरद पवारांवर टीका

सोलापूर, ३० एप्रिल – माढ्यात १५ वर्षांपूर्वी एक मातब्बर नेता या ठिकाणी निवडणूक लढवण्यासाठी आले होते. त्यावेळचे लोक सांगतात की, या बड्या नेत्याने तेव्हा 'मावळत्या सूर्याच्या साक्षी'ने माढ्यातील दुष्काळी भागाला पाणी देण्याची शपथ घेतली होती. पण त्यांनी ते आश्वासन पूर्ण केले नाही. लक्षात आहे ना... आता त्यांना शिक्षा देण्याची वेळ आली आहे. एक तो दिवस होता आणि एक आजचा दिवस आहे. त्या नेत्यानं अनेक आश्वासनं देऊन पाणी पोहोचवलं नाही. म्हणूनच त्या नेत्यात आज इथून निवडणूक लढवण्याची हिंमत नाही, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नाव न घेता शरद पवारांवर निशाणा साधला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, मंगळवारी माळशिरस येथे माढ्याचे भाजप उमेदवार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर यांच्यासह धाराशिव आणि लातूर येथील उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतली. या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रकांत बावनकुळे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, माढा लोकसभेचे उमेदवार श्री रणजितसिंह नाईक निंबाळकर, धाराशिव लोकसभेच्या उमेदवार श्रीमती अर्चना पाटील आणि लातूर लोकसभेच्या उमेदवार श्री सुधाकर तुकाराम श्रृंगारे यांच्यासह महायुतीचे नेते व्यासपीठावर उपस्थित होते. या सभेसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह दिग्गज नेते व्यासपीठावर होते.

मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''येळकोट येळकोट...' चा जयघोष करण्यात आला. विठोबा-रखुमाईच्या चरणी नतमस्तक होत मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. त्यांचा विशेष पेहराव सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील जनता आपले प्रेम देण्यात कोणतीही कसर सोडत नाही, परंतु जर कोणी आपले वचन पूर्ण केले नाही तर ते त्याच्याकडे हिशोब चुकते करतात. १५ वर्षांपूर्वी एका खूप मोठ्या नेत्याने महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागाला पाणी देण्याचे आश्वासन दिले होते, परंतु ते आश्वासन पूर्ण केले नाही, त्यामुळेच येथून निवडणूक लढवण्याची हिंमत त्यांना दाखवता येत नाही. ६० वर्षात जगातील सर्व देश खूप बदलले, पण काँग्रेसला देशाच्या शेतापर्यंत पाणीही पोहोचवता आले नाही. २०१४ पर्यंत सुमारे १०० सिंचन योजना अनेक दशकांपासून प्रलंबित होत्या, त्यापैकी २६ महाराष्ट्रात होत्या. प्रत्येक शेतात आणि घरापर्यंत पाणी पोहोचवणे हे मोदींच्या आयुष्यातील मोठे मिशन आहे. २०१४ मध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर काँग्रेसने रखडलेल्या सुमारे १०० सिंचन योजनांपैकी ६३ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ५० वर्षांपासून रखडलेले निळवंडे धरणाचे काम मोदी सरकारने पूर्ण केले आणि गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राचे महायुती सरकार अथक प्रयत्न करत आहे. मोदी सरकारने केवळ ५ वर्षात ११ कोटींहून अधिक घरांना नळाद्वारे पाणी पुरवले आहे. गेल्या १० वर्षांत सूक्ष्म सिंचनाची व्याप्तीही वाढली असून, त्याचा लाभ महाराष्ट्रातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना मिळत आहे. देश स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करत असताना मोदींना शेतकरी आणि शेतमालाची काळजी होती, म्हणून भाजप सरकारने ७५ अमृत सरोवर बांधण्याचा संकल्प केला होता. हे सर्व अमृत सरोवर पुढील अनेक पिढ्यांसाठी सार्थ ठरतील.




# मुंबईतील सर्व जागा महायुतीच जिंकणार

## केलेल्या कामांची पावती जनता देणार असल्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विश्वास

मुंबई : गेल्या दोन वर्षांपासून महायुती सरकारने मुंबईत चांगली कामे केली आहेत. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान मोदी यांनी केलेले काम लोकांसमोर आहे. महायुतीने केलेल्या कामांची पावती जनता देईल. पियुष गोयल यांच्यासह मुंबईतील सर्व जागा महायुती नक्की जिंकेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

उत्तर मुंबईचे भाजपाकडून उमेदवारी देण्यात आलेल्या पियुष गोयल यांनी उमेदवारी अर्ज



भरला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी मुंबईत विजयाचा विश्वास व्यक्त केला. शिवसेनेकडून मुंबईत तीनही उमेदवार मराठी दिलेले आहेत. पियुष गोयल मुंबईकर आहेत. त्यामुळे पियुष गोयल अमराठी आहेत, अशा प्रकारचा आक्षेप घेता कामा नये. कोणालाही तसा आक्षेप घेण्याचा अधिकार नाही. पियुष गोयल प्रचंड मताधिक्याने विजयी होतील, असे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.

**झाडे कापल्याचा आदित्य ठाकरेंनी हिशोब द्यावा**

गेल्या २५ वर्षांत जेवढे काम झाले नाही, तेवढे काम दोन वर्षांत करण्याचा प्रयत्न महायुती सरकारने केला आहे. या कामांचा परिणाम या निवडणुकीतून नक्की दिसून येईल, असे सांगत आदित्य ठाकरेंनी केलेल्या टीकेवर बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांच्या काळात किती झाडे कापली गेली, याचा हिशोब त्यांनी आधी द्यायला हवा. त्यांची सत्ता येणे म्हणजे मुर्खांच्या नंदनवनात फिरणे, अशी गत आहे, असा खोचक टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लगावला.

# महाराष्ट्रात ६६१ तर मुंबईत १८६ बेकायदेशीर शाळा, नवी मुंबईतही ५ शाळा अनधिकृत

नवी मुंबई : नवी मुंबईमधील शाळांमध्ये आपल्या पाल्यासाठी प्रवेश घेणाऱ्या पालकांना नवी मुंबई महानगरपालिकेने सावध केले आहे. राज्याची कोणतीही मान्यता नसलेल्या अनधिकृत अशा पाच शाळा नवी मुंबई शहरात सुरू आहेत व अशा शाळांमध्ये आपल्या मुलासाठी प्रवेश घेणे टाळा, असे पालिकेने म्हटले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी शहरातील ५ अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे. बेकायदा घोषित केलेल्या या सर्व

**अनधिकृत घोषित केलेल्या शाळांची यादी**

**अल मोमिना स्कूल, बेलापूर., इकरा इंटरनॅशनल स्कूल, नेरुळ., ऑर्किड इंटरनॅशनल स्कूल, सीवूड्स., शालोम प्रायमरी स्कूल, तुर्भे., इलिम इंग्लिश स्कूल. रबाळे.**

शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत.

महानगरपालिकेने या शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये असे सांगितले आहे. तसेच या शाळांमध्ये आधीच शिकत असलेल्यांना सरकारी शाळांमध्ये प्रवेश घेण्यास सांगितले आहे. याबाबत एका अधिकाऱ्याने सांगितले, 'या शाळा योग्य प्रक्रियेचे पालन न करता कार्यरत आहेत. त्यांनी राज्याची किंवा महामंडळाची कोणतीही मान्यता घेतलेली नाही. शाळेने आपला व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला तरीही, येथे शिकणाऱ्यांचे भविष्य धोक्यात येईल.

या शाळांना, शिक्षण हक्क कायद्यानुसार परवानग्या मिळवा किंवा दंडात्मक कारवाईसाठी तयार राहा, अशा सूचना देणाऱ्या नोटिसा बजावण्यात येणार असल्याचे महामंडळाने म्हटले आहे.

दरम्यान याआधी डिसेंबर २०२३ मध्ये, शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी लेखी उत्तरात माहिती दिली होती की, महाराष्ट्रात बेकायदेशीरपणे चालवल्या जाणाऱ्या ६६१ शाळांवर कारवाई सुरू करण्यात आली असून खासगी संस्थांना दंड ठोठावण्यात आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (इचउ) हद्दीत सुरू असलेल्या १८६ बेकायदेशीर शाळांची माहिती त्यांच्या विभागाकडे असल्याची पुष्टीही केसरकर यांनी केली होती.

# कोविडची पहिली लस बनवणाऱ्या शास्त्रज्ञावर भ्रष्टाचाराचे आरोप

## चीनच्या सरकारने केले निलंबित

बिजिंग : चीनच्या पहिल्या कोविड – १९ वरील लस निर्मिती करणाऱ्या टीमचे नेतृत्व करणाऱ्या चीनमधील सर्वात मोठ्या लस निर्मात्या कंपनीतील वरिष्ठ शास्त्रज्ञ यांग शिओमिंग यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून राष्ट्रीय विधानमंडळाच्या उपपदावरून निलंबित करण्यात आले आहे. चीनच्या नॅशनल पीपल्स काँग्रेसने (एनपीसी) शुक्रवारी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, यांग यांच्यावर 'शिस्त आणि कायद्याचे गंभीर उल्लंघन' केल्याचा आरोप आहे. स्थायी समितीच्या चार दिवसांच्या बैठकीनंतर झालेल्या एनपीसीच्या विधानात सूचित केले होते की, यांगची आधीच पक्ष शिस्तपालन संस्था – केंद्रीय शिस्त तपासणी आयोगाकडून चौकशी केली जात आहे. मागच्या काही वर्षांपासून राष्ट्रपती शी जिनपिंग यांनी देशात भ्रष्टाचारविरोधी मोहीम हाती घेतली आहे. यांग यांची बरखास्ती ही भ्रष्टाचारविरोधी अभियानाचा एक भाग असल्याचं बोललं जात आहे. चीनमधील आरोग्य यंत्रणेतील ही सर्वात मोठी कारवाई समजली जातेय.

यांग हे एक अनुभवी शास्त्रज्ञ आहेत. त्यांनी सीएनबीजीमध्ये लस बनवणाऱ्या टीमचं नेतृत्व केलं होतं. या टीमनेच सिनोफार्मा बीबीआयबीपी-कोरवी व्हॅक्सिन बनवली होती. चीनची ही पहिली कोरोना व्हॅक्सिन होती. चीनच्या या पहिल्या लशीला सार्वजनिक उपयोगाकरीता मान्यता देण्यात आलेली होती. विशेष बाब म्हणजे यांग शिओमिंग यांना सप्टेंबर २०२० मध्ये त्यांच्या कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आलेला होता.

# एक जूनपासून टी२० वर्ल्डकपचा थरार!

## ९ जूनला भारत पाकिस्तान सामना रंगणार!, रोहित शर्मा कर्णधार तर हार्दिक पांड्या उपकर्णधार

नवी दिल्ली : टी२० वर्ल्डकपसाठी भारतीय संघाची आज बीसीसीआयकडून घोषणा करण्यात आली आहे. टी२० वर्ल्डकपसाठी बीसीसीआयने १५ खेळाडूंची निवड केली आहे. या संघाचे नेतृत्व रोहित शर्मा करणार आहे तर उपकर्णधारपदी हार्दिक पांड्याची निवड करण्यात आली आहे.

बीसीसीआयने मोठा निर्णय घेत ऋषभ पंत आणि संजू सॅमसनला संघात स्थान दिले आहे. तर रिंकू सिंग, शुभमन गिल, आवेश खान आणि खालील अहमदला राखीव ठेवले आहे. मात्र के. एल. राहुलला डावलण्यात आले आहे.

टी२० वर्ल्डकपमध्ये भारताचे स्थान अ गटात आहे. भारताचा पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंड विरुद्ध होणार आहे तर ९ जून रोजी भारत पाकिस्तान विरुद्ध सामना खेळणार आहे. यूएसए विरुद्ध १२ जून रोजी तर १५ जून रोजी भारतीय संघ कॅनडा विरुद्ध सामना खेळणार आहे.



भारतीय संघ : रोहित शर्मा (कर्णधार), हार्दिक पांड्या (उप कर्णधार), विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, सूर्यकुमार यादव, रिषभ पंत, संजू सॅमसन, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, युझवेंद्र चहल, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह.

**असे आहेत विश्वचषक गट..**

अ गट- भारत, पाकिस्तान, आयर्लंड, कॅनडा, अमेरिका

ब गट- इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, नामिबिया, स्कॉटलंड, ओमान

क गट- न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, अफगाणिस्तान, युगांडा, पापुआ न्यू गिनी

ड गट- दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, नेदरलँड, नेपाळ

**वर्ल्डकपसाठी टीम इंडिया**

**फलंदाज – ४**

रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, विराट कोहली, सूर्यकुमार यादव,

**अष्टपैलू – ४**

हार्दिक पंड्या (उपकर्णधार), रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शिवम दुबे,

**विकेट कीपर – २**

ऋषभ पंत, संजू सॅमसन,

**फिरकीपटू – २**

कुलदीप यादव, युजवेंद्र चहल,

**वेगवान गोलंदाज – ३**

अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज.

**भाग ०३** सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग झाला ओसाड

# ५५ किलोमिटर मध्ये ५८ हजार झाडांची लागवड..







तभा वृत्तसेवा/सहयोग प्र.जावळे

कन्नड:- दि.३० एप्रिल- दैनिक तरुण भारत वृत्तपत्राच्या तिसऱ्या वृत्त मालिकेमध्ये आज आपण सोलापूर - धुळे महामार्गावर करोडी ते तेलवाडी या मार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा अंतर्गत दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या खाजगी कंत्राटदाराने किती वृक्षारोपण केले आहे व ते वृक्ष कोणत्या प्रजातीचे आहेत ते बघणार आहोत,

करोडी ते तेलवाडी या महामार्गाचे काम सन २०१७ -१८ या कालावधीत सुरू झाले तर सदर महामार्ग रहदारीसाठी तात्पुरत्या स्वरूपात सन २०२१ मध्ये मंजुरी घेऊन सुरू करण्यात आला. पण याच महामार्गावर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलीप बिल्डकॉन लिमिटेड या खाजगी कंत्राटदाराला वृक्षारोपण करण्याचे काम दिले,या खाजगी कंत्राटदाराने सन २०२१ साली तेलवाडी ते करोडी दरम्यान ५५ किलोमिटर अंतरात ५८,१४३ झाडांची लागवड केली त्यात रस्ताच्या मध्यभागी २२५१४ शोभिवंत झाडांची लागवड केली तर रस्ताच्याकडेला ३५६२९ वृक्षलागवड करण्यात आली, अशी माहिती भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिली.यामध्ये त्यांनी सांगितले की निम,पिंपळ, गुलमोहर, करंज,कांचन, या प्रजातींचे झाडाची लागवड रस्त्याच्या कडेला केली आहे, तर रस्त्याच्या मध्यभागी टीकोमा,बोगनवेल,शंकासुर,कनेर,या शोभिवंत प्रजातींच्या वनस्पतीची लागवड केलेली आहे.

त्यातच सदर महामार्गालगत छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव असा रेल्वे मार्ग करावा अशी मागणी स्थानिक नेते व नागरिकांकडून जोर धरू लागली होती. त्यामुळे रस्त्याच्या कडेला करण्यात येणाऱ्या लागवडीला उशीर झाला.

> **झाडांची नैसर्गिक प्रक्रिया आहे, झाडे जोपासने हे आमचे महत्वाचे उद्दिष्ट आहे आणि त्याच अनुषंगाने आम्ही काम करून घेत आहोत,काही झाडे दगावली असेल तर त्या ठिकाणी पुन्हा नव्याने वृक्ष लागवड आम्ही करून घेत आहोत,कन्नड तालुक्यातील सर्वच झाडांना जोपासने ही आणि या झाडांचे संगोपन चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी आमची टीम कार्यरत आहे**
>
> **रवींद्र इंगोले**
> **प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग**

प्रत्यक्षात वृक्षारोपण केलेली झाडे महामार्गाच्या दुतर्फा दिसून येत नाहीत,तीन पेक्षा जास्त वर्षांचा कालावधी उलटुन गेला तरी झाडांचे कोणत्याच प्रकारचे संगोपन हे नियमितपणे झालेले दिसत नाही,त्यामुळेच झाडांची वाढ होऊ शकली नाही असे दिसून येते,नागरिकांना व निसर्गप्रेमींना जे स्वप्नं दाखवण्यात आले ते स्वप्नं प्रत्यक्षात दिसून येत नाही त्यामुळे निसर्गप्रेमींमध्ये नाराजीचा सूर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे, केवळ कागदोपत्रीच झाडांची देखरेख सुरू आहे का असा प्रश्न आता उपस्थित होत आहे !

प्रत्यक्षात झाडांची झालेली हेळसांड व कागदावरील देखरेखी मुळे ओसाड बनलेल्या या महामार्गाची सविस्तर माहिती पुढील लेखात

**क्रमशः**

# जगात महिलांची पाटी कोरीच! पण भारतीय जनता पार्टीने दिली महिला उमेदवारांना सर्वाधिक संधी

## लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यांत फक्त २३५ महिलांनाच मिळाले तिकीट

नवी दिल्ली : यंदाच्या लोकसभा निवडणुकीतील पहिल्या दोन टप्प्यातील २ हजार ८२३ उमेदवारांपैकी फक्त २३५ म्हणजेच आठ टक्के महिला उमेदवार रिंगणात होत्या. यामुळे राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढविण्यासाठी राजकीय पक्षांकडून केले जात असलेले दावे अतिशय पोकळ असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

निवडणुकीतील पहिल्या टप्प्यातील एकूण १३५ महिला उमेदवारांपैकी तब्बल ७६ महिला उमेदवार एकट्या तामिनाडूमधील होत्या. तर दुसऱ्या टप्प्यात सर्वाधिक २४ महिला उमेदवार केरळ राज्यात होत्या. या दोन्ही टप्प्यात भारतीय जनता पार्टीने अन्य पक्षांच्या तुलनेत महिला उमेदवारांना जास्त संधी दिली. या दोन्ही टप्प्यात भाजपने एकूण ६९ महिला उमेदवारांना तिकीट दिले तर काँग्रेस पक्षाने ४४ महिला उमेदवारांना संधी दिली.

मागील वर्षात ज्या ५२ देशांमध्ये निवडणुका झाल्या त्यातील सहा देश असे आहेत



जिथे पाच पेक्षा कमी महिला खासदार आहेत. ओमान देशात तर एकही महिला निवडून आलेली नाही. मागील एक वर्षाच्या काळात संसदेतील महिलांच्या भागीदारीत काहीच सुधारणा झालेली नाही. जगभरात महिलांच्या राजकारणातील प्रतिनिधीत्वाबाबतही उदासिनता दिसून येते. राजकीय पक्ष शक्यतो महिलांना उमेदवारी देण्याच्या मानसिकतेत दिसत नाहीत, हेच यावरून सिद्ध होत आहे.

भारताचा विचार केला तर परिस्थिती फार काही वेगळी नाही. २०१९ मधील लोकसभा निवडणुकीत ७८ महिला उमेदवार निवडणूक जिंकून संसदेत पोहोचल्या होत्या. यातील १२ महिला अशा होत्या ज्यांनी तीन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा निवडणूक जिंकली आहे. भाजप नेत्या मेनका गांधी रेकॉर्ड ८ वेळा निवडणूक जिंकून संसदेत पोहोचल्या होत्या. त्यामुळे भारतीय राजकारणातही महिलांची स्थिती फार काही वेगळी नाही, असेच म्हणावे लागेल.

**सूट्टीची सूचना**

०१ मे २०२३ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त 'सोलापूर तरूण भारत' कार्यालयास सुट्टी असल्यामुळे ०२ मे २०२३ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही याची सर्व वाचक, एजंट, जाहीरातदार यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

www.tarunbharat.net
तरुण भारत
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# लोकशाहीचा महाकुंभ





## निवडणुकायन

### डिपॉझिट जप्त



**निवडणुकींच्या** काळात अनेकदा आपण जाहीर सभांमधून नेते मंडळी एकमेकांना आव्हान देताना बघत असतो. 'या निवडणुकीत तुझं डिपॉझिटच जप्त होणार' असेही काही वेळा कानावर पडत असते. निवडणुकीत डिपॉझिट जप्त होण्याला का बरे इतके मानहानीकारक मानल जाते, असाही प्रश्न अनेकांच्या मनात येतो. निवडणूक निकाल लागल्यानंतर एक गोष्ट सर्वाधिक बोलली जाते, ती म्हणजे डिपॉझिट जप्तीची. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ अन्वये एखादा उमेदवार लोकसभा किंवा विधानसभा निवडणूक लढवत असेल, तर त्याला निवडणूक आयोगाकडे ठराविक रक्कम जमा करावी लागते. वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये ही रक्कम वेगवेगळी असते.

### कोणत्या निवडणुकीत किती डिपॉझिट?

**निवडणूक आयोगाच्या मते, वेगवेगळ्या निवडणुकांमध्ये डिपॉझिटची रक्कम बदलते.**

- १) लोकसभा निवडणुकीत उमेदवाराला सुरक्षा ठेव म्हणून २५ हजार रुपये जमा करावे लागतात. ही रक्कम सर्वसाधारण श्रेणीतील उमेदवारासाठी आहे. त्याच वेळी एसटी, एससी श्रेणीतील उमेदवारांना १२,५०० रुपये जमा करावे लागतात.
- २) विधानसभा निवडणुकीसाठी सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवाराला १० हजार रुपये आणि एसटी, एससी प्रवर्गातील उमेदवाराला ५ हजार रुपये जमा करणे आवश्यक आहे.
- ३) राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत प्रत्येक प्रवर्गातील उमेदवाराला समान रक्कम जमा करावी लागते. राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला १५ हजार रुपयांची रक्कम जमा करावी लागते.

### डिपॉझिट कधी जप्त होते?

निवडणूक आयोग नावनोंदणी करणाऱ्या उमेदवारांकडून निश्चित रक्कम घेतो. निवडणुकीत ठराविक मते न मिळाल्यास डिपॉझिट जप्त केले जाते. मतमोजणीत कोणत्याही उमेदवाराला १६.६६ टक्के मते मिळणे आवश्यक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास उमेदवाराचे डिपॉझिट जप्त केले जाते. उदाहरणार्थ, विधानसभेच्या जागेवर दोन लाख मते असतील आणि त्या जागेवरून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराला ३३,३३२ पेक्षा कमी मते मिळाली असतील, तर त्याचे डिपॉझिट जप्त केले जाते. त्याचबरोबर राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत उमेदवाराला १/६ मते मिळणे आवश्यक आहे.

### किती रक्कम परत मिळते?

उमेदवाराला सिक्युरिटी डिपॉझिट वाचविण्यासाठी १/६ पेक्षा जास्त मते मिळवावी लागतात, परंतु, उमेदवार विजयी झाला तर सिक्युरिटी डिपॉझिट त्याला परत केले जाते. याशिवाय १/६ पेक्षा जास्त मते मिळविणाऱ्या उमेदवारालाही रक्कम परत केली जाते. याशिवाय उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यास त्याला रक्कम परत मिळते.

# सुरतनंतर इंदूरमध्येही काँग्रेसला धक्का

## अक्षय बम यांनी मागे घेतली उमेदवारी; भाजपात प्रवेश

◆ **इंदूर, २९ एप्रिल**

गुजरातच्या सुरतनंतर आता मध्यप्रदेशच्या इंदूरमध्येही काँग्रेसला जबरदस्त झटका बसला. या मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार अक्षय कांती बम यांनी सोमवारी अचानक आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. ते लवकरच भाजपात प्रवेश करणार असल्याची माहिती भाजपाचे वरिष्ठ नेते कैलास विजयवर्गीय यांनी दिली.

इंदूर लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांना कुठलीही कल्पना न देता अक्षय बम यांनी अचानक आज आपला अर्ज मागे घेतला. इंदूरचे जिल्हाधिकारी आशिष सिंह यांनी या वृत्ताची पुष्टी केली आहे.



उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर बम यांनी थेट विजयवर्गीय यांची भेट घेतली आणि त्यांच्याच कारमधून प्रवास केला. यावेळी त्यांच्यासोबत भाजपाचे स्थानिक आमदार रमेश मेंडोला हे देखील होते.

अक्षय बम यांच्यासोबतचे छायाचित्र 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करताना, त्यांचे भाजपात स्वागत आहे, अशी ओळ विजयवर्गीय यांनी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वात अक्षय बम लवकरच भाजपात येणार आहेत, असेही विजयवर्गीय यांनी एक्सवर म्हटले आहे. विशेष म्हणजे, अक्षय बम पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. काँग्रेसने त्यांना भाजपाचे विद्यमान खासदार शंकर लालवानी यांच्याविरोधात उमेदवारी दिली होती. (वृत्तसंस्था)

# गुजरातमध्ये पंतप्रधान मोदींचा 'डुप्लिकेट' चर्चेत!

◆ **अहमदाबाद, २९ एप्रिल**

बरेचदा एखाद्या व्यक्तीचे एखादा सेलेब्रिटी, राजकीय किंवा क्रिकेटर्सच्या चेहऱ्याशी असलेले साम्य थक्क करणारे असते. सध्या इन्स्टाग्रामवर अशाच एका व्यक्तीचा चेहरा आणि पेहराव लोकांना संभ्रमात टाकताना दिसत आहे. कारण, या व्यक्तीचा चेहरा आणि पेहराव पंतप्रधान नरेंद्र मोदींसारखा आहे.

ही व्यक्ती गुजरातमध्ये पाणीपुरी विक्रीचे काम करते. या व्यक्तीचा व्हिडीओ व्हायरल केल्यावर नेटकऱ्यांकडून त्याला पसंती मिळत आहे. अनेक युझर्सनी या व्हिडीओवर कमेंट्सही केल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यांचा आवाज पंतप्रधान मोदींच्या आवाजाशी ७० टक्क्यांपर्यंत मिळताजुळता आहे, अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.



पंतप्रधान मोदी यांच्यासारख्या दिसणाऱ्या या व्यक्तीचे नाव अनिल ठक्कर आहे; पण लोक त्यांना मोदी या नावाने ओळखतात. अर्थात् त्यामागे काही विशेष कारणे आहेत. त्यांच्या चेहऱ्याच्या एका बाजूची ठेवण आणि पेहराव अगदी पंतप्रधान मोदींसारखा आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी ते नरेंद्र मोदी असल्याचा भास होतो. ही गोष्ट ठक्कर यांना खूप आवडते.

मोदी चहा विक्रेता होते आणि मी पाणीपुरीवाला आहे. आमच्यात फारसा फरक नाही, असे ठक्कर नमूद करतात.


तुम्ही पाणीपुरीऐवजी चहा विकला असता, तर मोठ्या पदापर्यंत पोहोचला असता, असे लोक म्हणत असल्याचे ठक्कर सांगतात. अनिल ठक्कर यांनी वयाच्या १५व्या वर्षापासून पाणीपुरी विक्री सुरू केली. त्यांनी हे दुकान सुरू केले, तेव्हा ते २५ पैशांना पाणीपुरी विकत होते. विशेष म्हणजे, ते वर्षाला लाखो रुपयांची पाणीपुरी विकतात. (वृत्तसंस्था)

# अपक्ष उमेदवारांचा भर 'तुतारी'वर

## अपक्षांना १९० चिन्हे

◆ **नाशिक, २९ एप्रिल**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत अपक्ष उमेदवारांसाठी निवडणूक आयोगाने १९० चिन्हांची यादी प्रसिद्ध केली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे चिन्ह असलेल्या तुतारी वाजविणारा मनुष्य या चिन्हाशी नामसाधर्म्य असलेल्या तुतारी चिन्हासाठी अपक्षांनी आतापासून 'फिल्डिंग' लावली आहे. या व्यतिरिक्त कपाट, सफरचंद, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरा, खाट, भेटवस्तू, गॅस सिलेंडर अशा चिन्हांचा त्यात समावेश आहे.



नाशिक व दिंडोरी मतदारसंघासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ६ मे रोजी माघारीनंतर निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. त्याच दिवशी उमेदवारांना चिन्हाचे वाटप केले जाणार आहे. निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या यादीनुसार, देश व राज्यस्तरावर नऊ राजकीय पक्षांना मान्यता दिली असून, त्यांचे निवडणूक चिन्हही अंतिम करण्यात आले.

याशिवाय, अपक्ष उमेदवारांसाठी आयोगाने १९० चिन्हे अंतिम केले आहेत. त्यात शिट्टी, तंबू, कलिंगड, दूरध्वनी, टीव्ही, रिमोट, त्रिकोण, सोफा, कात्री, सेफ्टी पिन, प्रेशर कूकर, शिवण यंत्र, पेनड्राईव्ह, रोड रोलर, टुथपेस्ट, संगणक माऊस, ऑटोरिक्षा, पाव, कॅमेरा, कॅरम बोर्ड अशा चिन्हांचा समावेश आहे. त्यामुळे निवडणुकीत अपक्षांना कोणते चिन्ह मिळणार, यावरून मतदारांमध्ये आता उत्सुकता लागून राहिली आहे. (वृत्तसंस्था)

# प्रचाराच्या झंझावातातही आहाराबाबत नेते सजग

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

एप्रिल-मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात होणाऱ्या सभांसाठी मातब्बर नेते आहाराबाबत सजगता बाळगत प्रचारसभा घेत आहेत. योग्य आहार, भरपूर पाणी पिणे आणि जमेल तेवढी झोप घेणे याची सांगड घालत नेत्यांनी आपापल्या उमेदवारांसाठी प्रचाराचा धडाका लावला आहे.

माजी केंद्रीय मंत्री शरद पवार एकेका दिवशी किमान चार सभा, मेळावे व पत्रपरिषदा घेत आहेत. त्या-त्या गावी मुक्काम करून सभेनंतर महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीगाठी घेत आहेत.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी सदैव सज्ज असतात. एकेका ठिकाणी ठाण मांडून प्रश्न निकाली काढतात आणि वादावर तोडगा काढतात. ते कोल्हापूर येथे दोन दिवस मक्कामी होते. राज्यभर प्रचार करीत असतानाही मुख्यमंत्री शिंदे मध्येच मुंबई ठाण्याचा दौराही करतात. रात्री सभा घेतात व त्यानंतरही लोकांना भेटतात. या काळात ते थोडाफार आहार करतात.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिवसाला तीन ते पाच सभा घेतात. सध्या ते केवळ एकवेळ जेवतात. न्याहारी भरपूर घेतात. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दिवस पहाटे पाच वाजता सुरू होतो. सकाळी सात वाजता संपर्क दौरा सुरू होतो. बारामतीतून विविध ठिकाणांहून सभा घेऊन परत येतात.

या नेत्यांच्या दिमतीला वाहने हजर आहेत. मध्यंतरी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना अतिश्रम आणि उन्हामुळे चक्कर आली. मात्र, त्यांनी काही वेळातच भाषण देऊन प्रचारातील उत्साह दाखवून दिला.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे प्रचारासाठी फिरत आहेत. ते आहाराबाबत अत्यंत जागरुक आहेत. ते मोजकेच पदार्थ घेतात. प्रचारादरम्यान कुटुंबातील एक व्यक्ती त्यांच्या समवेत असते. अनेकदा पत्नी रश्मी असतात, कधी धाकटा मुलगा तेजस, तर कधी सचिव मिलिंद नार्वेकर सोबत असतात. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले प्रचाराच्या काळात तेलकट पदार्थ घेण्याचे टाळतात. चाळीसच्या आसपास तापमान असल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांनाही काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. (वृत्तसंस्था)



**राजनाथसिंह यांनी सोमवारी लखनौ मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत उत्तरप्रदेश आणि उत्तराखंडचे मुख्यमंत्री अनुक्रमे योगी आदित्यनाथ व पुष्करसिंह धामी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात स्मृती इराणी यांनी अमेठीतून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव व भाजपाचे इतर नेते उपस्थित होते. अर्ज दाखल करण्यापूर्वी इराणी यांनी गौरीगंज येथील भाजपा कार्यालयातून रोड शो आयोजित केला.**



# राजगडमध्ये दिग्विजयसिंह अडचणीत

## मतांसाठी वणवण फिरण्याची वेळ

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

आपल्या वादग्रस्त विधानाने काँग्रेस पक्षाला वेळोवेळी अडचणीत आणणारे मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह राजगड या आपल्या



लोकसभा मतदारसंघात अडचणीत आले आहेत. त्यामुळे ही माझी शेवटची निवडणूक आहे, यानंतर मी निवडणूक लढणार नाही, (त्यामुळे यावेळी मला कसेही करून निवडून द्या) असे भावनिक आवाहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

दिग्विजयसिंह यांना माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याविरोधात विदिशा मतदारसंघातून निवडणूक लढवायची होती, पण काँग्रेसने त्यांना राजगडमधून उमेदवारी दिली. या मतदारसंघात त्यांचा मुकाबला भाजपाचे विद्यमान खासदार रोडमल नागर यांच्याशी आहे. नागर २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघातून निवडून आले होते. यावेळी विजयाची हॅट्ट्रिक करण्यासाठी ते मैदानात उतरले आहेत.

नागर पंतप्रधान मोदी यांच्या नावावर आणि त्यांच्या सरकारच्या विकासकामावर मते मागत आहे. तर, दहा वर्षे तुम्ही एक खासदार पाहिला आहे, आता पाच वर्षे मला द्या, असे आवाहन दिग्विजयसिंह करीत आहेत.

राजगड मतदारसंघ हा दिग्विजयसिंह यांना नवा नाही. १९८४ आणि १९९१ ची लोकसभा निवडणूक त्यांनी येथून जिंकली होती. १९८९ च्या निवडणुकीत मात्र त्यांचा पराभव झाला होता. १९९३ मध्ये खासदार असतानाच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर त्यांना खासदारकी सोडली होती. त्यावेळी झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांचे भाऊ लक्ष्मणसिंह विजयी झाले होते. १९९६, १९९८ आणि १९९९ अशा तीन निवडणुका लक्ष्मणसिंह यांनी काँग्रेस उमेदवार म्हणून या मतदारसंघातून लढवल्या आणि जिंकल्या होत्या. २००४ ची लोकसभा निवडणूक लक्ष्मणसिंह यांनी भाजपा उमेदवार म्हणून लढवत जिंकली होती.

२०१९ ची लोकसभा निवडणूक दिग्विजयसिंह यांनी भोपाळ मतदारसंघातून लढवली होती. भाजपाच्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी त्यांचा पराभव केला होता. राजगड लोकसभा मतदारसंघातील आठ विधानसभा मतदारसंघापैकी सहा विधानसभा मतदारसंघ भाजपाकडे आहे, काँग्रेसकडे फक्त दोन विधानसभा आहेत. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत या ८ मतदारसंघात भाजपाला काँग्रेसपेक्षा १ लाख ७१ हजार मते जास्त मिळाली होती.

# जवानी दाखवण्यासाठी दिग्गीराजांच्या पदयात्रा

◆ **नवी दिल्ली, २९ एप्रिल**

राजगड लोकसभा मतदारसंघात सुरुवातीला भाजपा उमेदवार रोडमल नागर यांच्याबद्दल मतदारांमध्ये नाराजी होती. त्यामुळे नागर यांनी मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत जाहीर सभेत मतदारांची माफीही मागितली होती. तुम्ही मला मत देऊ नको, पण मोदींना मत द्या, भाजपाला मत द्या, असे आवाहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली.

गृहमंत्री अमित शाह यांनी नागर यांच्यासाठी प्रचारसभा घेत वातावरण बदलवून टाकले. 'दिग्विजयसिंह इनका जनाजा ऐसा निकाला जाये, जैसे आशिक का जनाजा निकाला जाता है', असे आवाहन करीत शाह यांनी खळबळ उडवून दिली.

दिग्विजयसिंह पाकिस्तानी दहशतवादी हाफीज सईदचा उल्लेख 'साहब' असा करतात, झाकिर नाईकची गळाभेट घेतात, याकडे शाह यांनी लक्ष वेधले. परिणामी रोडमल नागर विरुद्ध दिग्विजयसिंह या लढतीला आता अमित शाह विरुद्ध दिग्विजयसिंह असे वळण मिळाले.

दिग्विजयसिंह ७७ वर्षांचे आहेत. काँग्रेसने बुढ्याला उमेदवारी दिली, असा आरोप भाजपा करीत होती, याचा उल्लेख करीत दिग्विजयसिंह म्हणाले की, काँग्रेसने बुढ्याला उमेदवारी दिली, असा आरोप भाजपा करीत आहे, त्यामुळे माझी जवानी दाखवण्यासाठी मी पदयात्रा काढत आहे.

'वादा निभाओ यात्रा' अशी पदयात्रा करीत दिग्विजयसिंह या आठ विधानसभा मतदारसंघांत पदयात्रा करीत आहेत. दिग्विजयसिंह यांच्यासाठी त्यांचे पुत्र जयवर्धनसिंह आणि नातू सहस्त्रजयसिंह मत मागत आहे. म्हणजे त्यांच्या तीन पिढ्या मत मागत फिरत आहे. राजघराण्यातील दिग्विजयसिंह यांच्यावर मतांसाठी वणवण फिरण्याची वेळ या निवडणुकीत आली. यावरून ही निवडणूक त्यांच्यासाठी अडचणीची असल्याचे दिसून येते.

दिग्विजयसिंह यांना जशी आपल्या विजयाची चिंता आहे, तशीच गुणा लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार ज्योतिरादित्य शिंदे यांचा पराभवही करायचा आहे. मध्यप्रदेशच्या राजकारणात कधीकाळी काँग्रेसमध्ये दिग्विजयसिंह, कमलनाथ आणि ज्योतिरादित्य शिंदे असे तीन गट होते. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीनंतर ज्योतिरादित्य शिंदे मुख्यमंत्री होऊ नये म्हणून दिग्विजयसिंह यांनी कमलनाथ यांना पाठिंबा दिला होता. त्याची परिणती नंतर ज्योतिरादित्य शिंदे यांच्या काँग्रेसमधील बंडात आणि भाजपात प्रवेश करण्यात झाली होती. (तभा वृत्तसेवा)

# रामराम भारतात नाही, मग पाकिस्तानात जाऊन करायचे का?

## देवेंद्र फडणवीसांचा उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार

◆ **मुंबई, २९ एप्रिल**

रामराम भारतात नाही, तर मग काय पाकिस्तानात जाऊन करायचे का? असा प्रश्न उपस्थित करीत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्ला चढवला. तुम्ही केलेले एकतरी विकासाचे काम दाखवा, असे आव्हानदेखील फडणवीसांनी दिले.



उद्धव ठाकरे यांनी रत्नागिरीच्या जाहीर सभेत बोलताना, पंतप्रधान नरेंद्र मोदींना मत म्हणजे विकासाला नव्हे तर, विनाशाला मत देणे होय. त्यामुळे जनतेने जागरुक राहावे. मोदी मतांसाठी राम-राम करीत फिरत आहेत, असे विधान केले होते. या विधानाचा खरपूस समाचार घेत उपमुख्यमंत्री फडणवीसांनी सोलापुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ठाकरेंना सडेतोड उत्तर दिले.

पंतप्रधान मोदींनी केलेला विकास पूर्ण देश पाहतो. तुम्ही केलेले एकतरी विकासाचे काम दाखवा. तीन वर्षे मुख्यमंत्री राहिले, एक तरी विकासाचे काम दाखवा. आयुष्यात त्यांनी काही विकासाचे काम केले नाही. त्यांनी मोदींबद्दल बोलणे म्हणजे सूर्याकडे थोबाड करून थुंकण्यासारखे आहे, असा पलटवारही फडणवीस यांनी केला. (तभा वृत्तसेवा)

## अग्रलेख...

# लोकशाहीच्या महोत्सवातील नारीशक्तीचा सहभाग

सध्या १८ व्या लोकसभेच्या गठनासाठी निवडणूक होत आहे. मतदानाचे दोन टप्पे पार पडले आहेत. या दोन्ही टप्प्यांमध्ये महिला मतदारांनी दिलेला प्रतिसाद अभूतपूर्व असाच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या दोन्ही कार्यकाळात नारीशक्तीला दिलेले महत्त्व या निवडणुकीच्या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. मतदानाच्या प्रक्रियेतील महिलांचा सहभाग लक्षणीय दिसून येत आहे. आर्थिक-सामाजिक समानता मिळायला लागल्यापासून लोकशाहीत महिला अधिक सक्रिय झाल्याचे आनंददायी चित्र पाहायला मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने महिलांच्या उन्नतीचाच विचार देशापुढे मांडला आणि तो अंमलात आणण्याचाही कसोशीने प्रयत्न केला. त्याचाच हा परिपाक आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांनी एक पाऊल पुढे टाकत भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्याचा केलेला संकल्प आपली लोकशाही भविष्यात अधिक प्रगल्भ होणार, याचेच संकेत देत आहे. सामाजिक-आर्थिक समानता प्रस्थापित होत असेल तर महिलांची पावले आपोआप मतदान केंद्रांकडे वळतात, असे जगभरातील अनेक देशांमध्ये झालेल्या सर्वेक्षणांती आढळून आले आहे. गेल्या काही वर्षांत भारतात स्त्री-पुरुष भेदभाव मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे पाहायला मिळत आहे. ज्या देशात लैंगिक भेदभाव केला जातो, त्या देशातील महिला मतदानाच्या प्रक्रियेत अपेक्षित सहभाग नोंदवत नाहीत, हे वास्तव आहे. भारत या वास्तवाला आता अपवाद ठरत आहे, ही आनंदाची बाब मानावी लागेल. आज एकही क्षेत्र असे नाही, ज्यात महिलांनी आघाडी घेतली नाही. मग, मतदानाच्या प्रक्रियेत तरी महिला मागे कशा राहतील? मोदींच्या दुसऱ्या कार्यकाळात संसदेत नारीशक्ती वंदन विधेयक पारित झाले आहे. त्यानुसार पुढल्या निवडणुकांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. ही बाबसुद्धा महिलांना मतदानाच्या प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यास प्रेरित करते आहे. महिला आत्मनिर्भर होत आहेतच; आत्मसक्षमही होत आहेत. आत्मसशक्तीकरण एकदम घडून आलेले नाही. त्यासाठी स्वातंत्र्यानंतरची ७५ वर्षे खर्ची पडली आहेत. आत्मसशक्तीकरणाचा संबंध हा लैंगिक समानतेशीही आहे. भारतीय महिला सशक्त व मजबूत अशा मतपेटीच्या रूपात पुढे येतील, असे आकलन देशात झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर 'आयरिश टाईम्स'ने केल्याचे आपल्याला स्मरत असेलच. त्या काळात त्यांनी केलेले आकलन किती परिपूर्ण होते, हे आता आपल्या सगळ्यांच्याच अनुभवास येत आहे. इंदिरा गांधी यांनी देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे सांभाळली, त्याचवेळी जागतिक समुदायाचे डोळे विस्फारले होते. आता तर द्रौपदी मुर्मू या भारताच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती बनल्या आहेत. जगातल्या सर्वाधिक लोकसंख्येच्या देशात एक महिला सक्षमपणे राष्ट्रपतिपद सांभाळते आहे, ही बाब महिलांच्या सशक्तीकरणाची प्रक्रिया भारतात किती मजबूत झाली आहे, याचा साधार पुरावा देणारी आहे. सध्या देशाच्या अर्थमंत्रिपदी निर्मला सीतारामन् या महिलाच आहेत. त्यांनी या पदावर काम करताना देशाच्या अर्थव्यवस्थेत झालेली सुधारणा संपूर्ण जगाने पाहिली आहे. अशी सगळी परिस्थिती असताना लोकशाहीत निवडणुकीच्या प्रक्रियेतील महिलांचा लक्षणीय सहभाग आपली लोकशाही भविष्यात जगात सर्वश्रेष्ठ ठरणार, याचेच संकेत देत आहे. भारताला लोकशाहीचे धडे देऊ पाहणाऱ्या आणि स्वत:ला विकसित म्हणवणाऱ्या अनेक देशांना भविष्यात भारताकडूनच धडे घ्यावे लागणार, यात शंका नाही. महिला ग्रामीण भागातील असो की शहरी भागातील, महिला अशिक्षित असोत की सुशिक्षित, त्या कमावत्या असोत वा मग गृहिणी, त्यांना हे चांगले कळले आहे की, आपण मत कुणाला दिले पाहिजे. त्यामुळे प्रत्येक राजकीय पक्ष आज आपल्या जाहीरनाम्यामध्ये महिलांना प्राधान्य देताना दिसतो आहे. जो राजकीय पक्ष महिलांच्या समस्या समजून घेईल, त्या सोडविण्याचा प्रयत्न करेल आणि न्याय देईल, त्या पक्षाला महिला मतदान करतात, हा अनुभव गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या निवडणुकांमधून येत आहे. त्यासाठी एक उदाहरण आपल्याला लक्षात घेता येईल. २०१५ साली बिहारमध्ये विधानसभेची निवडणूक होती आणि सत्तेत आल्यास दारूबंदी केली जाईल, असे आश्वासन नितीशकुमार यांनी दिले होते. त्यांच्या या आश्वासनावर महिला मतदारांनी विश्वास ठेवला आणि त्यांच्या पक्षाला भरभरून मतदान केले होते. कारण नवरे दारू पीत असल्याने आणि आहारी गेल्याने असंख्य महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले होते. त्यातून सुटका व्हावी यासाठी दारू बंद होणे गरजेचे होते. या गरजेतून त्यांनी नितीशकुमार यांना निवडून दिले होते. २०१४ पासून महिला वर्ग आनंदाची अनुभूती घेत आहे. कारण त्यांच्या सगळ्या समस्या एकामागून एक सोडविण्याचा विडा उचललेली व्यक्ती देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान आहे. घर बांधण्यासाठी अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत असेल, वैद्यकीय उपचार घेण्यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत मदत देणारी आयुष्मान योजना असेल, उज्ज्वला योजनेतून कोट्यवधी महिलांना मोफत गॅस सिलेंडर मिळत असेल तर महिलांचे कष्ट कमीच होणार आहेत. शिवाय, महिलांच्या उत्थानासाठी अनेकानेक योजना भारतीय जनता पार्टीकडून लागू केल्या जात आहेत, तसा उल्लेख यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यातही भाजपाने केला आहे. त्यामुळे महिलांनी भाजपाला मत द्यावे, हे त्यांना वेगळे सांगण्याची आवश्यकताही भाजपाला पडणार नाही. सांगायचा उद्देश हाच की, आता महिलांच्या कल्याणाकडे, त्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रत्येक राजकीय पक्षाला निवडणूक जिंकायची असेल तर महिलांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावेच लागेल. मध्यप्रदेशातही शिवराजसिंह मुख्यमंत्री असताना भारतीय जनता पार्टीने 'लाडली बहन योजना' लागू करण्याचे आश्वासन दिले होते. शिवराज यांची ओळख 'मामा' अशी झाली होती. त्यातूनच महिलांनी मोठ्या प्रमाणात भाजपाला मतदान केले आणि पुन्हा भाजपाची सत्ता आली. अशा प्रकारे आता प्रत्येकच पक्ष महिलांसाठीच्या योजनांवर भर देताना दिसतो आहे आणि त्याच्या परिणामी महिलांच्या मतदानाचा टक्का वाढलेला दिसतो आहे. महिला मतदारांनी भ्रामक भावनांना बळी पडण्याचे दिवस आता सरले आहेत. कुण्या एका राजकीय पक्षाच्या प्रलोभनाला बळी पडून त्याच पक्षाला महिलांनी मतदान करण्याचे दिवस संपले आहेत. एखादा राजकीय पक्ष वा नेता आपला हितैषी आहे आणि आपल्या कल्याणाची कामे करू शकतो, असा विश्वास जर महिलांच्या मनात निर्माण झाला आणि त्यांच्याशी भावनात्मक नाते निर्माण झाले तर महिला मतदार अशा पक्षाला वा नेत्याला डोळे झाकून मतदान करतात, ही बाब मात्र स्वीकारावी लागेल. आंतरराष्ट्रीय संबंध, शेअर बाजारातील चढउतार याच्याशी महिलांना फारसे देणेघेणे नसते, ही बाबही प्रकर्षाने आढळून आली असली, तरी आताशा महिला आधीपेक्षा जास्त शिक्षित झाल्या असल्याने यातही त्या लक्ष घालू लागल्या आहेत. गेल्या ५० वर्षांत झालेल्या निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचे विश्लेषण केले तर असे आढळून येते की, महिलांच्या मतदानाचा टक्का वाढतच चालला आहे. महिलांच्या प्रश्नांना मिळत असलेले प्राधान्य याला कारण ठरले आहे. काही ठिकाणी तर पुरुष मतदारांपेक्षा महिलांनी जास्त प्रमाणात मतदान केले आहे. अपवाद सोडले तर मतदार कधीही कुण्या एका राजकीय पक्षासोबत राहात नाही. मात्र, महिलांच्या बाबतीत असे होत नाही. महिला मतदार त्यांची निष्ठा सहजासहजी लवकर बदलत नाहीत. विशेषत: महिलांच्या सन्मानाचा, अस्मितेचा आणि सुरक्षेचा मुद्दा असतो, तेव्हा त्या त्यांच्या पसंतीच्याच उमेदवाराला आणि पक्षाला मतदान करतात आणि करायलाही पाहिजे. उत्तरप्रदेश विभानसभेची निवडणूक याचे उदाहरण आहे. उत्तरप्रदेशात योगींच्या राजवटीत जे कुख्यात गुंड मारले गेलेत, असंख्य तडीपार झालेत आणि भीतीने पळून गेलेत, त्यामुळे महिलांनी मोकळा श्वास घेतला. याचा परिणाम असा झाला की, महिला मतदारांचा कल भाजपाच्या दिशेने वळला. प्रत्येक राज्यात हे असेच होणार. जो पक्ष, जो नेता महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देणार, त्यालाच नारीशक्ती पाठिंबा देणार!

## आंतरराष्ट्रीय

# हिरण्यगर्भ, बोसॉन आणि (हिग्ज बोसॉन) देव कण

**वसंत गणेश काणे**

'हिरण्यगर्भ' याचा अर्थ सोन्याच्या अंड्यात राहणारा असा आहे. विश्वाच्या निर्मितीचा स्रोत हिरण्यगर्भात आहे, असे वैदिक तत्त्वज्ञान सांगते. याने पृथ्वी, सूर्य, तारे यांची निर्मिती केली. ऋग्वेदातील हिरण्यगर्भ सूक्तात असे उल्लेख आहेत.

*हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।*
*स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम सूक्त ॥*
*ऋग्वेद-१०-१२१-१*

तेजस्वी, सर्व प्राणिमात्रांच्या अगोदर निर्माण झालेला, एकमेवाद्वितीय, जगाचा पालनकर्ता असलेला, त्यानेच पृथ्वी आणि अवकाश धारण केले आहे, अशा देवाला कोणती बरे आहुती द्यावी?

विश्वनिर्मितीचे गूढ उकलण्यासाठी आज मांडल्या गेलेल्या सिद्धांतांपैकी महास्फोटाच्या (बिगबँग) सिद्धांताला सर्वाधिक मान्यता आहे. पण महास्फोटानंतर पदार्थ/जडवस्तू (मॅटर) कशा तयार झाल्या, हे शास्त्रज्ञांच्या लक्षात येत नव्हते. जे जागा व्यापते आणि ज्याचे वजन करता येते, त्याला 'मॅटर' किंवा 'पदार्थ/जडवस्तू' असे म्हणतात. पण या जडवस्तू निर्माण कशा झाल्या, हा प्रश्न मात्र अनेक वर्षे सुटत नव्हता. परमाणूपेक्षाही लहान असलेला एक कण (सबअॅटॉमिक) इतर कणांना वस्तुमान (मास) देतो, अशी पीटर हिग्ज यांची संकल्पना होती. भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांचेही या संदर्भातील संशोधन असेच मोलाचे ठरले आहे. त्यांच्या संकल्पनेतील उपअणुकणाला त्यांच्या सन्मानार्थ 'बोसॉन' असे नावही देण्यात आले होते. या कणाचे अस्तित्व मात्र सिद्ध करता आले नव्हते.

पीटर हिग्ज यांचे एडिनबरो येथे निधन झाले. विज्ञानातील बोजड संकल्पना अगदी सोप्या भाषेत समजावून देण्यात त्यांचा हातखंडा होता. ब्रह्मांडाचे नियंत्रण करणाऱ्या मूलभूत शक्तिसंदर्भातील मानवाचे ज्ञान आणि समज यांना पीटर हिग्ज यांनी नवी दिशा दिली आहे. हिग्ज यांनी १९५४ साली एडिनबरो विद्यापीठातून डॉक्टरेटची पदवी संपादन केली. ज्याला आकारमान आहे त्याला वस्तुमान असलेच पाहिजे. असे आहे तर मग सूक्ष्मातिसूक्ष्म कणांना त्यांचे वस्तुमान कसे प्राप्त होते, हा प्रश्न त्यांना बेचैन करीत होता. त्यांनी कणांना (पार्टिकल) वस्तुमान मिळण्यासाठी मदत करणारा सूक्ष्मातिसूक्ष्म मूलकण अस्तित्वात असला पाहिजे, हे १९६४ मध्येच वर्तविले होते. पुढे २०१२ मध्ये ते कण प्रत्यक्षात सापडल्यानंतर २०१३ मध्ये त्यांना नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले.

**हिग्ज फील्ड आणि हिग्ज बोसॉन :** पीटर हिग्ज यांनी एका वेगळ्या क्षेत्राची (हिग्ज फील्ड) कल्पना सुचविली आहे. माशांसाठी जसे पाणी, तसे आपल्यासाठी हिग्ज फील्ड आवश्यक आहे, असे पीटर हिग्ज सुचवितात. तसेच त्यांनी वेगळ्या कणाचीही कल्पना मांडली आहे. हे वस्तुमानविरहित कण हिग्ज फिल्डच्या संपर्कात आल्यानंतर त्यांची फील्डशी प्रक्रिया होते आणि फील्डमधील कणांना वस्तुमान प्राप्त होते. हिग्ज बोसॉन कणांनादेखील याच क्षेत्रातून वस्तुमान मिळते आणि हे कण इतर कणांना वस्तुमान मिळण्यासाठी कारणीभूत ठरतात. २०१२ साली स्वित्झर्लंडमधील एका संशोधन संस्थेने दोन अणूंची टक्कर घडवून आणली आणि या अणूंना वस्तुमान बहाल करणाऱ्या कणाचा शोध लावला.

**(उत्तरार्ध)**

या प्रयोगात जे कण निर्माण झाले, त्यात बोस आणि हिग्ज यांनी कल्पिलेले कण होते. म्हणून 'हिग्ज बोसॉन' असे नाव पीटर हिग्ज आणि बोस यांच्या सन्मानार्थ या कणाला देण्यात आले आहे. ५० वर्षांपूर्वी गणिताच्या मदतीने या कणाच्या अस्तित्वाचा सिद्धांत पीटर हिग्ज यांनी मांडला होता. भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांचेही या संदर्भातील संशोधन याच मोलाचे होते. याच कणांना 'देव कण' (गॉड पार्टिकल) असे नाव मिळाले आहे.

**लार्ज हॅड्रॉन कोलायडर :** २० व्या शतकाच्या उत्तरार्धात पीटर हिग्ज यांनी वर्तविलेल्या हिग्स बोसॉन कणांचा शोध घेण्याची मोहीम कणविषयक भौतिकशास्त्रज्ञांनी हाती घेतली. हा हेतू समोर ठेवून स्वित्झर्लंडमधील युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्यूक्लिअर रीसर्च (सर्न) या संस्थेने कणांना प्रचंड गती देणारे एक अजस्र यंत्र तयार केले. लार्ज हॅड्रॉन कोलायडर (एलएचसी) नावाची प्रयोगशाळा म्हणजे जमिनीखाली असलेली भल्या मोठ्या व्यासाची एक लांब नळी आहे. ही नळी सेमीकंडक्टर पदार्थांच्या कंकणाकृती चुंबकांची बनलेली असते. 'सर्न' ही एक अद्ययावत प्रयोगशाळा आहे. जिनेव्हा शहराजवळ जमिनीखाली अनेक किलोमीटर पसरलेल्या या प्रयोगशाळेत आण्विक कणांना प्रचंड वेग देऊन, त्यांच्या टकरी घडवून आणण्याची व्यवस्था आहे. यामध्ये चुंबकीय बलाच्या मदतीने कण जवळजवळ प्रकाशाच्या वेगाने फिरविले जातात व त्यांची टक्कर घडवून आणली जाते. २०१२ साली या अणूंच्या टकरीनंतर हिग्ज बोसॉन सापडला. अणूच्या मूलभूत संरचनेत त्याला वस्तुमान देणारा हिग्ज बोसॉन नसता, तर हे विश्वच निर्माण होऊ शकले नसते, असे पीटर हिग्ज म्हणत असत. बोसॉनसह एकूण १७ कण सापडले आहेत. या गटाला आणि बलाला स्टँडर्ड मॉडेल, असे म्हणतात. हे १७ कण दोन गटांत विभागता येतात. फर्मिऑन्स आणि बोसॉन्स. फर्मिऑन्स म्हणजे विटा. फर्मिऑन्स १२ असून याचेही दोन गट पडतात. ६ फर्मिऑन्सचा एक गट आणि ६ लेप्टॉन्सचा दुसरा गट. थोडक्यात फर्मिऑन्स + लेप्टॉन्स = भौतिक वस्तूचा अणू. बोसॉन्स ५ आहेत. प्रत्येक बोसान ३ पैकी १ बल वाहून नेतो. चौथे बल गुरुत्वाकर्षण आहे. याची पातळी अतिशय कमी असल्यामुळे त्याचा स्टँडर्ड मॉडेलमध्ये समावेश केला जात नाही.

**गॉडडॅम पार्टिकल :** आज जग हिग्ज बोसॉनला देव कण / 'गॉड पार्टिकल' म्हणत असले, तरी विज्ञान मात्र हे नाव मान्य करत नाही. लिऑन लेडरमन या शास्त्रज्ञाने या कणांवर 'गॉडडॅम पार्टिकल' या नावाचे पुस्तक लिहिले. पण हे नाव प्रकाशकाने बदलून 'गॉड पार्टिकल' असे केले. 'गॉडडॅम' हा शब्दप्रयोग लेखकाने सहजासहजी हाती न लागणारा (चकमा देणारा) या अर्थी केला होता. पण प्रकाशकाला गॉड आणि डॅम हे दोन शब्द जवळजवळ मांडलेले आवडत नव्हते. म्हणून त्याने 'डॅम' हा शब्द वगळून 'गॉड पार्टिकल' या शीर्षकानुसार ते पुस्तक प्रसिद्ध केले. तेच नाव आज रूढ झाले आहे. विश्वाच्या उत्पत्तीनंतर ग्रह-तारे, सजीव अथवा निर्जीव यांना प्राप्त झालेले वस्तुमान हे अणूमध्ये असलेल्या या अतिसूक्ष्म कणामुळे मिळाले आहे, असे गृहीतक पीटर हिग्ज यांनी गणिताच्या साहाय्याने मांडले होते.

**पीटर हिग्ज जवळ मोबाईल नव्हता :** पीटर हिग्ज यांना २०१३ मध्ये नोबेल पारितोषिकाने गौरविण्यात आले. नोबेल समितीने त्यांना पारितोषिकाबद्दल कळविण्यासाठी फोन केला तेव्हा ते भोजनासाठी हॉटेलमध्ये गेले होते. तिथून परतत असताना एका परिचित व्यक्तीने त्यांना थांबवून नोबेल पारितोषिक मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तोपर्यंत त्यांना या गोष्टीचा पत्ताच नव्हता! त्यांच्याकडे मोबाईल नसल्यामुळे 'रॉयल स्वीडिश अॅकॅडमी' त्यांचे नाव घोषित करण्यापूर्वी त्यांच्यापर्यंत पोहोचू शकली नव्हती, म्हणून नोबेल पारितोषिक जाहीर झाल्याची बातमी सर्व जगाला त्यांच्या अगोदर कळली. ही बातमी कळणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये स्वत: पीटर हिग्ज यांचा क्रमांक बहुदा सर्वात शेवटचा असावा!.

९४२२८०४४३०

## वेध

**राजेंद्र मारोटकर**

# शहरी मतदार उदासीन का?

लोकसभा निवडणुकीत मतदानाची कमी होत असलेली टक्केवारी खरोखरच चिंतेची बाब आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात होणारे कमी मतदान हे तर अतिशय चिंताजनक आहे.

लोकसभा निवडणूक २०२४ साठी मतदानाचे पहिले दोन टप्पे पार पडले. पहिला टप्पा १९ एप्रिलला तर दुसरा टप्पा २६ एप्रिलला पार पडला. पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या मतदारसंघांत मतदान झाले. दुसऱ्या टप्प्यात, म्हणजे २६ एप्रिलला पश्चिम विदर्भातील वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि यवतमाळ-वाशीम या मतदारसंघांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडली. विदर्भातील दोन्ही टप्प्यांतील मतदानाच्या टक्केवारीचा विचार केला असता नागपूर आणि अमरावती या दोन विभागीय कार्यालये आणि महानगरपालिका असलेल्या शहरांमधील मतदानाची टक्केवारी त्या-त्या विभागांतील ग्रामीण भागातील मतदानाच्या टक्केवारीच्या तुलनेत खूप कमी आहे.

नागपूर आणि अमरावती या विदर्भातील दोन मोठ्या शहरांमधील मतदान अनुक्रमे ५६ आणि ५७.५१ टक्के झाले तर दोन्ही महसूल विभागांच्या ग्रामीण भागांतील मतदानाची टक्केवारी ही साधारणपणे ६४ टक्क्यांच्या वरच आहे. वैशिष्ट्य म्हणजे, ज्याला आपण आदिवासी किंवा मागास म्हणून संबोधतो अशा गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघ आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या कोरकू आदिवासी असलेल्या भागात ७१ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे. असा विरोधाभास का? तसे पाहिले तर मतदानाची टक्केवारी या उलट असायला हवी होती. म्हणजे शहरी भागात जास्त तर ग्रामीण भागात कमी! कारण शहरी भागात बहुतेक करून उच्चशिक्षित, नोकरदार, व्यापारी वर्ग राहतो. सरकारी नोकरदारांना मतदानाच्या दिवशी शासनातर्फे सुटी जाहीर केली जाते तसेच खाजगी क्षेत्रातील नोकरदारांना मतदानासाठी कामाच्या वेळेतून दोन तासांची सवलत दिली असते. याउलट ग्रामीण भागातील मतदार हे कमी शिक्षित, शेतकरी, शेतमजूर आणि हातमजुरी करणारे असतात. मतदान करायला जाण्यासाठी त्यांना त्या दिवसाची रोजीरोटी बुडवावी लागते. गडचिरोली आणि मेळघाटातील गावे तर दुर्गम भागात असतात. प्रत्येक गावात मतदान केंद्र असेलच असेही नाही. त्यामुळे अशा दुर्गम भागांतील मतदारांना मतदान करण्यासाठी जंगलातून पायवाट तुडवीत दुसऱ्या गावात मतदानासाठी जावे लागते. उलट शहरात मतदान केंद्र अगदी पायीच्या अंतरावर असतात. केंद्रावर मतदानाला जाण्यासाठी गाड्या दिमतीला असतात. असे असूनही ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागांतील मतदानाची टक्केवारी कमी असते. निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, मतदारांमध्ये मतदानाबाबत जाणीव-जागृती निर्माण व्हावी यासाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाल्यानंतर शासनातर्फे तसेच सामाजिक संघटनांतर्फे विविध माध्यमांतून जनजागृती केली जाते. उमेदवारसुद्धा प्रचाराचे भोंगे गल्लोगल्ली फिरवीत असतात. पूर्वी टांगे, रिक्षा आणि गाड्यांवर निवडणुकीचे भोंगे, उमेदवारांचे बॅनर्स लावून मोठमोठ्या आवाजात 'ताई-बाई- आक्का विचार करा पक्का आणि - चिन्हावर मारा शिक्का' अशा प्रकारचा प्रचार होत होता. त्यामुळे सर्वसामान्य मतदारांमध्ये निवडणुकीबाबत चर्चा होत होती. एक वेगळाच उत्साह मतदारांमध्ये असायचा. यावेळच्या लोकसभा निवडणुकीत अशा प्रकारचा प्रचार काही पाहायला मिळाला नाही. जो प्रचार झाला तो अतिशय नगण्य होता. यावेळी निवडणुकीला उभे असलेल्या उमेदवारांनी प्रचारासाठी जास्त करून समाज माध्यमांवरच भर दिला.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली आहेत. देशातील मतदार पूर्वीपेक्षा अधिक सुशिक्षित आणि सजग झाला आहे. त्यामुळे लोकसभा असो वा विधानसभा, दोन्ही निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढायलाच हवी. अमरावती लोकसभा मतदारसंघात पूर्वीच्या निवडणुकांच्या तुलनेत यावेळी मतदान ४ टक्क्यांनी जास्त म्हणजे ६४ टक्के झाले आहे, ही खरोखरच कौतुकाची बाब आहे. अन्य मतदारसंघांमध्येही तसे व्हायला हवे होते. देशात सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीचे अजून पाच टप्पे बाकी आहेत. यात मतदार अधिक जबाबदारीने जास्तीत जास्त मतदान करून जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असलेल्या भारताचे हात अधिक बळकट करतील, अशी अपेक्षा करू या.

९८५०२०९७१८

## दखल

# 'आत्मनिर्भर भारता'ची संरक्षण सिद्धता

**अभिजित वर्तक**

एकीकडे विस्तारवादी, विश्वासघातकी व विषारी फूत्कार टाकणारा 'ड्रॅगन' तर दुसरीकडे दहशतवादाला, जिहादी कारवायांना सातत्याने खतपाणी घालणारा पाकिस्तान असे दोन 'सख्खे शेजारी' आजूबाजूला असताना भारताला आपली संरक्षण सिद्धता प्रचंड प्रमाणात वाढवावीच लागणार, हे उघड सत्य आहे. मात्र, केंद्रातील भाजपाप्रणीत मोदी सरकारने संरक्षण क्षेत्राकडे जेवढ्या गांभीर्याने लक्ष दिले तेवढे काँग्रेस सरकारच्या काळातील सरकारांनी दिले नाही, ही कटू वस्तुस्थिती आहे. काही महिन्यांपूर्वी भारताच्या स्वदेशी हवाई क्षमतेत प्रचंड वाढ करणाऱ्या 'तेजस'मधून उड्डाण घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची संरक्षण सिद्धता जगाला दाखवून दिली आहे. भारतीय हवाई दल संरक्षण फळी अधिक मजबूत करण्यासाठी आणखी लढाऊ विमाने, हलके लढाऊ हेलिकॉप्टर्स खरेदी करणार आहे. यावर हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. कंपनी काम करणार आहे. 'मेक इन इंडिया' व 'आत्मनिर्भर भारत' योजनेंतर्गत सध्या केंद्र सरकार संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनावर भर देत आहे. तसेच स्वदेशी बनावटीची लढाऊ विमाने वायुदलात दाखल करण्यासंदर्भात करार करण्यात आला आहे. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड कंपनीचे 'लाईट कॉम्बॅट हेलिकॉप्टर तेजस' त्यापैकीच आहे. भारतीय हवाई दलाने अधिक लढाऊ विमाने आणि हलके लढाऊ हेलिकॉप्टर तेजस खरेदी करण्याची आणि सुखोई-३० श्रेणीतील विमाने अद्ययावत करण्याची योजना जाहीर केली आहे. या सर्व प्रकल्पांमुळे भारताचे आकाश अधिकाधिक सुरक्षित होणार आहे, हे निश्चित. पण, केवळ हवाई दलाचाच विचार करून चालणार नाही तर भारतीय लष्कर आणि भारतीय नौदल अर्थात तीनही सेनादलांना अधिक बळकटी देताना मोदी सरकारने 'आत्मनिर्भर भारत'ची घोषणा दिली आहे. जो देश संरक्षण साहित्याच्या, उपकरणांच्या बाबतीत सातत्याने दुसऱ्या देशांवर अवलंबून असतो त्या देशाची संरक्षण सिद्धता नेहमीच धोक्यात असते, हे लक्षात घेतले पाहिजे.

संरक्षण क्षेत्राच्या भांडवली खर्चाची सुरू असणारी सकारात्मक वाटचाल भारताच्या 'आत्मनिर्भरता' उपक्रमाला चालना देणारी आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी संरक्षण क्षेत्रातील भांडवली खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद १.७२ लाख कोटी रुपये आहे, जी आर्थिक वर्ष २२-२३ च्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा २०.३३ टक्के जास्त आहे आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या सुधारित



तरतुदीपेक्षा ९.४० टक्के जास्त आहे. ही तरतूद तीन सेवांच्या दीर्घकालीन एकात्मिक दृष्टिकोन योजनेशी सुसंगत असून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये महत्त्वपूर्ण अधिग्रहण प्रक्रिया पूर्ण करून सशस्त्र दलांच्या क्षमतांमध्ये असणारा फरक आधुनिकीकरणाद्वारे भरून काढणे, हा त्यामागचा उद्देश आहे.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिकेने भारताला हवाई संरक्षण व्यवस्थेसाठी अवॅक्स यंत्रणा व एफ-१६ विमाने देण्यास नकार दिला होता. त्यावेळी पाकिस्तानशी त्यांचे संबंध चांगले असल्याने अमेरिकेने पाकला मात्र ही विमाने पुरवली होती. त्यामुळे तत्कालीन भारत सरकारने तातडीने पावले उचलून संरक्षण व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी व अमेरिकेच्या तोडीस तोड विमाने खरेदी करण्यासाठी फ्रान्स व रशियाशी संरक्षण करार केला होता. मात्र, या देशांनी भारताची अडचण व गरज ओळखून भारताला लढाऊ विमानांचा तर पुरवठा केला; मात्र तंत्रज्ञानाचे हस्तांतरण केले नाही. त्यामुळे आपल्याला कायमच त्या देशांवर अवलंबून राहावे लागले तसेच यामुळे भारताचा संरक्षणविषयक खर्चही अफाट वाढत गेला. हा खर्च एवढा वाढला की, त्यामुळे एकूणच अर्थसंकल्पाचा मोठा हिस्सा यासाठी खर्ची करावा लागला. मध्यंतरी 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट'चा अहवाल समोर आला होता. या अहवालानुसार, संरक्षणासाठी खर्च करणाऱ्या देशांमध्ये भारत जगात तिसऱ्या स्थानावर आहे. अमेरिका पहिल्या तर चीन दुसऱ्या क्रमांकावर आहे. एका अहवालानुसार, भारताने २०१९ साली संरक्षण क्षेत्रात ७१ अब्ज डॉलर्स खर्च केले होते. २०१८ च्या तुलनेत हा आकडा ६.९ टक्क्यांनी अधिक आहे. भारत संरक्षण क्षेत्रातील सर्वाधिक वस्तू रशियाकडून खरेदी करतो. त्यानंतर अमेरिका, इस्रायल आणि फ्रान्स यांचा क्रमांक लागतो.

संरक्षण क्षेत्रात भारत अधिकाधिक आत्मनिर्भर आणि स्वदेशी तंत्रज्ञानयुक्त झाला पाहिजे आणि संरक्षणविषयक जास्तीत जास्त गरज देशांतर्गत प्रकल्पांतूनच भागली पाहिजे व यासाठी आयात थांबून निर्यातीत वाढ केली पाहिजे यासाठी जी तीव्र इच्छाशक्ती व राष्ट्रीय भावना लागते, नेमका याचाच आधीच्या बहुतांश सरकारांमध्ये अभाव होता. अटलबिहारी वाजपेयींच्या सरकारचा अपवाद सोडला तर २०१४ पूर्वीच्या बहुतांश सरकारांनी संरक्षण क्षेत्रात स्वदेशीला फारशी चालना दिली नाही. सरकारने 'आत्मनिर्भर भारत'ची घोषणा केल्यानंतर संरक्षण मंत्रालयाने त्यादृष्टीने पुढचे पाऊल टाकत शंभरहून अधिक उपकरणांची आयात थांबवून आत्मनिर्भर होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्याच्या दृष्टीने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. याचा पहिला टप्पा म्हणून संरक्षण मंत्रालयाकडून 'निगेटिव्ह आर्म्स लिस्ट' तयार करण्यात येत आहे. या सूचीत असलेल्या संरक्षण सामग्रीच्या आयातीवर बंदी घालण्यात येईल. लष्कराला आवश्यक साधनसामग्रीचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. २०२४-२५ पर्यंत आत्मनिर्भर अर्थात देशांतर्गत साधनसामग्रीचे उत्पादन व्हावे यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे शंभराहून अधिक उपकरणे आणि साधनसामग्रीची सिद्धता झाल्यानंतर आणखी एक सूची तयार करण्यात येणार आहे. 'निगेटिव्ह लिस्ट'मधील कोणत्याही गोष्टी आयात कराव्या लागू नयेत यासाठी उत्पादन ते प्रत्यक्ष पुरवठा करणाऱ्या संबंधितांशी चर्चा करून कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. कारण आता किंवा भविष्यातही युद्धसामग्री लागल्यास ती तयार करण्यासाठी आपली किती क्षमता आहे, याचा अंदाज घेणे अत्यावश्यक होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ऑगस्ट २०१५ ते ऑगस्ट २०२० या कालावधीत २६० योजनांसाठी ३.५ लाख कोटी रुपयांचे करार करण्यात आले. पुढच्या सहा ते सात वर्षांत चार लाख कोटी रुपये देशांतर्गत सुरक्षेशी निगडित उत्पादकांना मिळू शकतील. यापैकी १ लाख ३० हजार कोटी रुपये लष्कर आणि हवाई दलासाठी तर १ लाख ४० हजार एवढी रक्कम नौदलासाठीच्या साधनसामग्रीकरिता वर्ग करण्यात आली आहे. भारतीय सेनादलांना आवश्यक उपकरणे, सोयीसुविधा यांचे उत्पादन देशातील संरक्षण क्षेत्रातील उत्पादकांनी केल्यास स्वदेशीचे उद्दिष्ट प्रत्यक्षात पूर्ण होऊ शकेल.

९४२२९२३२०१

## सामाजिक विषवल्लींना ठेचा

'श्रीराम' हे समस्त हिंदूंचे आराध्य दैवत आहे. नुकतीच श्रीरामनवमी भारतासह जगभरात ज्या ज्या ठिकाणी हिंदू आहेत त्या ठिकाणी उत्साहाने साजरी करण्यात आली. श्रीरामनवमीनिमित्त दरवर्षी श्रीरामाच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जाते. यासाठी पोलिस प्रशासन तसेच रस्ते वाहतूक विभागाची रीतसर परवानगीही घेतली जाते. या मिरवणुकांत श्रीरामभक्त उत्साहाने सहभागी होतात. रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबतही खबरदारी घेतली जाते. असे असताना दरवर्षी श्रीरामनवमीच्या दिवशी मिरवणुकांवर कुठे ना कुठे समाजकंटकांकडून आक्रमण केले जाते. यंदाही बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगा शहरातील शक्तिपूर येथे मशिदीजवळ रामनवमीची मिरवणूक आल्यानंतर समाजकंटकांकडून मिरवणुकीवर हल्ला करण्यात आला. छतांवरून दगडफेक करण्यात आली. गावठी बॉम्ब फोडण्यात आले. माणिक्याहार आणि मेदिनीपूरच्या इग्रा येथेही श्रीरामनवमी मिरवणुकीवर आक्रमण करण्यात आले. तिन्ही ठिकाणी झालेल्या हिंसाचारात १८ जण जखमी झाले. त्यात दोन अल्पवयीन मुले, एक महिला आणि काही पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. माणिक्याहार परिसरात काही हिंदूंच्या घरांना लक्ष्य करून आगी लावण्यात आल्या. या परिसरात हिंदूंच्या उत्सवांवर आणि मिरवणुकांवर दरवर्षी अडथळे आणले जातात. असे असताना पोलिस प्रशासन पुरेशी खबरदारी का घेत नाही? हिंदूंचे उत्सव आले की बंगालमध्ये कुठे ना कुठे हिंसाचार झाल्याच्या बातम्या वाचनात येतात. ही स्थिती पाहिल्यावर पश्चिम बंगाल नक्की भारताचा भाग आहे की बांगलादेशचा, असा प्रश्न पडतो. भारतात पंथनिरपेक्ष लोकशाही राजवट आहे. त्यामुळे इथे समस्त पंथांचे लोक गुण्यागोविंदाने आणि आनंदाने नांदतात. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. देशाच्या काही ठरावीक भागांत मात्र दरवर्षी हिंदूंच्या सणांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून जातीय सलोखा बिघडवण्याचे काम काही समाजद्रोही मंडळींकडून केले जाते. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या अशा विषवल्लींना वेळीच ठेचायला हवे.

**जगन घाणेकर**/मुंबई

## वाचक पत्रे

### सणसणीत चपराक

सर्वोच्च न्यायालयाचा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या बाबतीत निर्णय म्हणजे विरोधी पक्ष आणि त्यांच्या समर्थकांना सणसणीत चपराक होय. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर जितक्या काही निवडणुका झाल्या, त्यात भाजपाला यश मिळाले. विरोधकांनी निराश व चिडून निकाल भाजपाने केलेल्या घोळामुळे आला, असा आरोप सातत्याने लावण्यात आला. विरोधकांनी ईव्हीएम हॅक केले जाऊ शकते. भाजपाला पाहिजे तसे मतदान झाल्याचे दाखविले जाऊ शकते यासाठी वाटेल तसा अपप्रचार सुरू केला. सामाजिक माध्यमात तर कहरच केला होता. या सर्व प्रकरणात त्यांच्यात जोश भरपूर, पण विश्वास शून्य होता. लगेचच ईव्हीएम हटाव अशी ओरड सुरू केली होती. उत्तरप्रदेशात भाजपाला कधी नव्हे ते घवघवीत यश मिळाल्यावर सर्व विरोधकांनी ईव्हीएमविरुद्ध मोठे आंदोलन करायचे ठरविले. मात्र, त्या काळाचे मुख्य निवडणूक आयुक्तांनी विरोधी पक्षांना खुले आव्हान दिले होते की, ईव्हीएममध्ये कसा घोटाळा होऊ शकतो, ते करून दाखवावे. पण एकाही राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीने हे आव्हान स्वीकारले नाही; मात्र ओरड चालूच ठेवली. गंमत अशी की, एखाद्या राज्यात विधानसभेत निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला तर मात्र ईव्हीएमविरुद्ध एकही अक्षर बोलत नव्हते. काही पक्ष व त्यांचे समर्थक मागणी करायचे की आता मतदान बॅलेट पेपरवरच झाले पाहिजे. विरोधी नेते ईव्हीएम घोटाळ्याबद्दल इतके ठाम होते तर त्यांनी निर्वाचन आयोग कार्यालयासमोर आमरण उपोषण तरी करायला हवे होते. मात्र, काही महाभागांनी तथाकथित ईव्हीएम घोटाळासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि काल ती याचिका फेटाळण्यात आली. विरोधकांची ओरड म्हणजे 'नाचता येई ना अंगण वाकडं,' असे ठरले. आता ईव्हीएमवर अजिबात शंका नको.

**अमोल पाठक**/९५४५८९८४४६

### मोबाईलचा अतिरेकी वापर

सध्या रस्त्यांवरील अपघात वाढले आहेत. वाहने चालवताना मोबाईलवर बोलण्याचे प्रमाण सध्याच्या काळात वाढल्याचे दिसून येते. त्यामुळे अपघात होतात याकडे लोकांचे साफ दुर्लक्ष झालेले दिसून येते. असे लोक स्वत:सोबतच इतरांचाही जीव धोक्यात घालतात. वाहने चालवताना मोबाईलवर बोलणे धोक्याचे आहे हे त्यांच्या लक्षात येत नाही. या सवयीमुळे अपघात घडल्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. चालकाने मोबाईलवर बोलताना वाहन बाजूला थांबवून बोलावे, हेही यांच्या लक्षात येत नाही. पोलिसांनी या वाहनचालकांविरोधात मोहीम हाती घेतली पाहिजे. शासनाने प्रसार माध्यमाद्वारे लोकांमध्ये जागृती करणे काळाची गरज आहे. यासाठी जनजागृती आणि शासनाचा धाक आवश्यक आहे.

**सुनील पुजारी**/९९२३०२६२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No 46878/87



# भरधाव ट्रकने चिरडल्या सहा दुचाकी; एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ३० एप्रिल -**

भरधाव वेगात येणाऱ्या अवजड वाहतुकीच्या ट्रकचे टायर फुटल्याने चालकाचा ताबा सुटून झालेल्या भीषण अपघातात सहा दुचाकी चिरडल्या गेल्या. यात गोविंद रामजी कोडेवाड (वय ७०) रा. खरबी ता. भोकर यांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मुदखेड तालुक्यातील बारड बसस्थानकाजवळील राष्ट्रीय महामार्गावर भोकर मार्गे नांदेडकडे जाणाऱ्या एम.एच.३४ बीजी ७४२३ सिमेंट मालवाहतूक ट्रकचे टायर फुटल्याने ता. ३० रोजी सकाळी आठ च्या सुमारास भीषण अपघात घडला आहे. हा अपघात इतका भीषण होता की वीस टन पेक्षा अधिक वजनाच्या मालवाहतूकीच्या ट्रकने उभ्या असलेल्या ९ दुचाकी चिरडत नेल्या तर नांदेडकडे जात असलेल्या एम. एच. २६ बी एफ ३७०४ या दुचाकीस चिरडल्याने गोविंद रामजी कोडेवाड यांचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकी चालक सुनील राठोड (वय ४८) गंभीर जखमी झाले आहेत. राठोड यांच्या डोक्याला जबर मार असल्याने खाजगी रुग्णालय यशोसाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या अपघातात दत्ता निलेवार, बालाजी मेटकर, आलिम मोमीन, आयुब खान पठाण, बालाजी रॅपणवाड, सचिन भालेराव यांच्या सह आदींच्या उभ्या असलेल्या दुचाकींचा चुराडा झाल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे.

# प्रचारात विस्कळीतपणा; खा. चिखलीकरांनी टोचले कान

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ३० एप्रिल -**

लातुर लोकसभा निवडणुक उमेदवाराचा प्रचार शेवटच्या टप्प्यावर आला आहे. ५ मे रोजी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. परंतु भाजप उमेदवारांच्या प्रचारात कार्येकर्ते व पदाधिकाऱ्यांत म्हणावी तेवढी गती आलेली दिसुन येत नाही. दि. २६ एप्रिल रोजी नांदेड लोकसभेचे मतदान झाले. खा. अशोक चव्हाण व खा. प्रताप पाटील चिखलीकर यांनी डोळ्यात तेल टाकून नांदेड मतदारसंघ पिंजून काढला. वाडी, तांडे, वार्ड, डोर टु डोर भेटुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकास धोरणावर मतदारांच्या दारापर्यंत गेले. परंतु लोहा-कंधार मतदारसंघात कार्येकर्ते व पदाधिकाऱ्यांनी लातुर लोकसभेच्या निवडणुकीतील उमेदवाराचा प्रचार उमेदवारांच्या मुख दर्शनापर्यंतच केला. वाडी, तांड्याच्या मतदारापर्यंत कार्येकर्ता व पदाधिकारी पोहोचलाच नाही. हा प्रकार निदर्शनास येताच खा.प्रताप पाटील चिखलीकर यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत कार्यकर्त्यांचे चांगलेच कान टोचले. प्रत्येकाने आप-आपले गावे, वाडी, शहर सांभाळा असे आवाहन केले.

लातूर लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने पुन्हा सुधाकर श्रृंगारे यांना उमेदवारी जाहिर केली. उमेदवारी जाहीर झाली म्हणुन घरात जल्लोष साजरा केला पण मतदारसंघत प्रचार उल्हासीत झाला नाही. निवडणूक उमेदवार नामांकन अर्ज १९ मे रोजी अखेरचा दिवस होता तेव्हापासुन मतदारसंघ पिंजून काढला असता पण उमेदवाराने तशी तसदी घेतली नाही. मग कार्यकर्त्यांमध्ये उल्हास कुठुन येईल अशी चर्चा सुरु आहे.

लातुर लोकसभा मतदारसंघात उमेदवाराने प्रसिद्ध खंडोबा देवस्थान येथे एका दिवशी दर्शन घेऊन मोजक्याच पदाधिकाऱ्यासोबत प्रचाराचे नारळ फोडून परत लातुर गाठले. काही दिवसांनंतर माळाकोळी, कंलबंर, उस्मानगर, कौठा परिसरात मतदारांच्या कॉर्नर, स्नेह भेटी अंती बैठका घेतल्या पण कुठे सकारत्मक तर नाकारत्मतक प्रतिसाद मिळाला. त्यांनतर बुथ कमेटीच्या बैठकिला उपस्थित राहुन कार्येकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या पण लोहा-कंधार मतदारसंघातील स्थानिक कार्येकर्ते व पदाधिकारी प्रचारासाठी गाडी व कार्ये कर्त्याचा ताफा घेऊन मतदारांपर्यंत प्रचारासाठी जाण्याऐवजी फक्त उमेदवार जिथे असेल तिथे जाऊन मुख दर्शन घेणे तिथून मुळ ठिकाणी परत येणे एवढाच प्रचाराचा कार्येक्रम आखलेला लातुर लोकसभा निरिक्षकाला दिसुन आला. नुकतेच व्यंकटेश मंगल कार्यालयात खा.प्रताप पाटील चिखलीकर व उमेदवार सुधाकर श्रृंगारे यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. त्या बैठकीत खा. चिखलीकरांनी उपस्थितांचे चांगलेच कान टोचले.

# नितीनिकेतन विद्यार्थी वसतीगृहात कोट्यावधी रुपयाचा अपहार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० एप्रिल -**

मुखेड तालुक्यातील जांब बु.येथील नामांकित निती निकेतन वसतीगृहात बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यावधी रुपयांचा अपहार करण्यात आला असून या अपहाराची चौकशी करावी अशी मागणी संजय यरपुरवाड यांनी सामाजिक न्याय विभागाचे सचिव व विभागीय समाज कल्याण आयुक्त यांच्याकडे केली आहे.

पंचक्रोशीतील त्रृषीतुल्य व्यक्तिमत्व शिक्षण महर्षी वी. रा. कोल्हे गुरुजी यांच्या हयाती नंतर विद्यमान अध्यक्ष अनिल विठ्ठल कोल्हे यांनी वसतीगृहाला शासनाची मूळ मान्यता नसताना बनावट कागद पत्राद्वारे शासनाची फसवणूक करून कोट्यावधी रुपयांचा अपहार केला. निती निकेतन वसतीगृहात बोगस नोंदणी दाखवून संबंधित अधिकारी व संस्थेचे पदाधिकारी यांनी इमारत भाडे व इतर बाबतीत लाखो कोट्यावधी रुपयाची शासनाची फसवणूक केले आहे. या प्रकाराची तक्रार केल्यानंतर चौकशी अधिकारी म्हणून निरीक्षक समाज कल्याण विभाग नांदेड यांची फक्त नावालाच नियुक्ती करण्यात आली. परंतु पुराव्यांसह तक्रारीची कुठलीच चौकशी न करता स्थानिक पातळीवरील अधिकारी कर्मचाऱ्यांनी तथाकथित संस्था अध्यक्ष, कार्यकारी मंडळ व वसतीगृह अधीक्षक यांच्याशी हात मिळवणी केली. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष, सचिव, संचालक मंडळ, वसतीगगृह अधीक्षक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी वस्तीगृह विभाग प्रमुख यांची तात्काळ विशेष समिती नेमुन चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय यरपुरवाड यांनी केली आहे.

## डॉ. आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हाणेगाव, ३० एप्रिल -**


हाणेगाव येथे आज दि.२९ रोजी महामानव बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न विश्वरत्न संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम नगरीचे सरपंच सौ. शारदादेवी राठोड माजी पं.स.सदस्य प्रितम देशमुख, उपसरपंच मुजीपोद्दीन चमकुडे, बालाजी इंगळे, विवेक पडकंठवार, हज्जु सेठ चमकुडे,योगेश देशमुख, रमेश राणे, प्रविन इनामदार,मुक्तार पटेल ग्रामसेवक अशोक जाधव यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पन करुन अभिवादन करण्यात आले. व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहन करुन सामुहीक बुद्ध वंदना करण्यात आली. यावेळी गावातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी भिमगीते गायन करुन लोकांचे मनं जिंकले. यावेळी गावातील प्रतिष्ठीत नागरीक राजु सावकार भाये, अशोक सावकार पटणे,बालाजी पोकलवार, बडगे, संजय घाळे, बिलाल मुजावर आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### बाभुळगाव येथे भीम जयंती उत्साहात साजरी

**नवीन नांदेड -** विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती दिनांक २९ एप्रिल रोजी बाभुळगाव येथे मोठ्या



उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३३ वी जयंती बाभुळगाव येथे दि. २९ एप्रिल रोजी सकाळच्या सत्रात धम्म ध्वजारोहण ग्रामपंचायतचे सरपंच पुंडलिक मस्के यांनी रामजी मस्के, दत्ता मोरे यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक यांच्या उपस्थित करण्यात आला. त्याचवेळी उपस्थितांनी पुष्प वाहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दुपारच्या सत्रात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक बाभुळगाव येथील मुख्य रस्त्याने वाजत गाजत थाटामाटाने मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थित काढण्यात आली. यावेळी नवयुक जयंती मंडळाचे अध्यक्ष जालिंदर लांडगे, उपाध्यक्ष प्रदीप लांडगे, आकाश लांडगे, राहुल लांडगे यांच्या पुढाकारातून भीम जयंती मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली यावेळी बाभुळगावसह परिसरातील समाज बांधव महिला मंडळ यांची मोठ्या प्रमाणात मिरवणुकीत सहभाग नोंदवला होता. या मिरवणुकीत काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नांदेड ग्रामीण ठाणेचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी गजानन तेलंग, उद्धव पवार, बालाप्रसाद टर्के, तुकाराम नांगरगोजे, सुनील सिंह बैस यासह पोलीस कर्मचारी यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

### हदगाव नगर परिषदेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी

**हदगाव -** महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक अशी खाती प्राप्त केलेले व ज्यांच्या सेवेने अवघा देश ज्यांना राष्ट्रसंत म्हणतो असे तुकडोजी महाराज यांच्या जयंतीदिनी निमित्त आज दि.३० एप्रिल रोजी हदगाव नगर परिषदेत मुख्याधिकारी नितीन लुंगे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. किर्तन - भजन च्या माध्यमातून समाजात पसरत असलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन व जातीभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांच्या आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करत जनप्रबोधन चा महत्वपूर्ण असा काम करत समाजात त्यांचा एक आदर्श स्थान निर्माण केला. यावेळेस जयंतीच्या कार्यक्रमात उपस्थित सतीश देशमुख, कुलदीप बोकारे, चक्रपाणी कदम, प्रसाद कदम, सखाराम बोरकर, शैलजा फुलारी, शेख अजीम, शेख मुजीब, सुरेश गिरबिडे, सिद्धार्थ पंडित यांची उपस्थिती होती.

### 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी



**नांदेड -** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये दि.३० एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, उपकुलसचिव डॉ. रवि एन. सरोदे, मेघश्याम साळुंके, डॉ. लक्ष्मीकांत आगलावे, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, तुकाराम भुरके, अरुण इंगोले, सुधाकर शिंदे, हरीश पाटील, गोविंद हंबर्डे, व्यंकटी पांचाळ, रामदास खोकले, कपिल हंबर्डे, व्यंकटी हंबर्डे, शिवाजी कल्याणकर, राजेश नाईक, मारोती कदम, दादाराव वैद्य, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

### देवराव कदम लगळूदकर यांचे निधन

**भोकर -** येथील लघु पाटबंधारे खात्यातील सेवा निवृत कर्मचारी देवराव लक्ष्मण कदम लगळूदकर यांचे वयाच्या ७३ व्या वर्षी अल्पशा आजाराने त्यांचे निवासस्थानी दि.२८एप्रिल रोजी निधन झाले आहे. दिवंगत कदम हे सामाजिक कार्यकर्ते संभाजी कदम शिक्षक व साहित्यिक चंद्रकांत कदम यांचे ते वडील आहेत त्यांच्या मागे पत्नी दोन मुले एक मुलगी असा परिवार असून त्यांचेवर दि.२९एप्रिल रोजी सकाळी १०वा.भोकर येथील बौद्ध समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी शहरातील सामाजीक कार्यकर्ते प्रतिष्ठित नागरीक पत्रकार उपस्थित होते.

# आरटीईची १ कि.मी. अंतराची अट शिथील करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० एप्रिल -**

शिक्षणाचा हक्क कायद्यातील सन २०२४-२५ मधील प्रवेश प्रक्रियेसाठी १ कि. मी. अंतराची अट शिथील करण्याची मागणी सामाजीक कार्यकर्ते भास्कर तुम्मा यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

मागासवर्गीय व दुर्बल घटकातील बालकांना शिक्षण मिळेल यासाठी हा कायदा अस्तीस्वात आला. या आरटीई अंतर्गत प्रवेश मिळत होते. परंतु चालू वर्षात महाराष्ट्र शासनाने १ किलोमिटरच्या आत शासकीय शाळा असल्यास खाजगी शाळेत प्रवेश घेता येणार नाही. अशी जाचक अट टाकली आहे. यामुळे अर्थिक दुर्बल तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे शासनाने १ किलोमीटरची अट शिथील करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भास्कर तुम्मा यांनी केली आहे.



**नांदेड- पुणे महानगरपालिका येथे झालेल्या पारलिंगी समुदायाच्या कर्मचारीवर अत्याचार विरोधात निषेध दर्शवत मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांना नांदेडच्या जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवेदन देताना तृतीयपंथी कल्याण मंडळ सदस्य डॉ. सानवी जेठवाणी, फरीदा शानुर बकश, अमरदीप गोधने.**

# पोलीस मैदानावर महाराष्ट्र दिनाचा १ मे रोजी शासकीय समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० एप्रिल -**

महाराष्ट्र राज्याचा ६५ वा स्थापना दिवस समारंभ बुधवार १ मे २०२४ रोजी वजीराबाद पोलीस मुख्यालय कवायत मैदान येथे सकाळी ८ वाजता राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभ होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याहस्ते ध्वजारोहण होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ७.१५ पुर्वी किंवा ९ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या दिनानिमित्त विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पध्दतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृहविभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही, याची दक्षता संबंधितानी घ्यावी, असेही आवाहनही केले आहे.

महाराष्ट्र राज्याचा ६५ वा स्थापना दिवस समारंभ १ मे २०२४ रोजी साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे २५ एप्रिल २०२४ रोजी परिपत्रक निर्गमित झाले आहे. या परिपत्रकात नमूद केल्यानुसार सर्व विभाग प्रमुखांनी कार्यक्रमाचे आयोजन करावे. तसेच ध्वजारोहण व्यवस्थीतरित्या पार पाडण्यासाठी महाराष्ट्र दिनाच्या पूर्व संध्येला रंगीत तालीम घ्यावी. तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या २ जानेवारी २०२४ रोजीच्या पत्रान्वये महत्वाचे दिवस साजरा करण्यासंदर्भात आदर्श आचारसंहिते बाबत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविले आहे.

## भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांची खा. चिखलीकर यांच्या निवासस्थानी भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० एप्रिल -**

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री विनोद तावडे हे आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.यावेळी अनेकांची उपस्थिती होती. लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान नुकतेच पार पडले नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी २६ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानंतर पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा माजी मंत्री विनोद तावडे हे नांदेड दौऱ्यावर आले होते. त्यांनी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या वसंत नगर स्थित निवासस्थानी सदिच्छा भेट दिली . खा.चिखलीकर परिवाराच्या वतीने तावडे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सत्कार करून स्वागत करण्यात आले. यावेळी माजी महापौर अजय सिंह बिसेन, अरविंद भैय्या निलंगेकर आदींची उपस्थिती होती.

## राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिक वापरास सक्त मनाई ध्वजसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० एप्रिल -**

राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरण्यात येऊ नयेत. यासाठी सर्व शासकीय यंत्रणांसह शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना आदीसह नागरीकांनी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

दरवर्षी २६ जानेवारी, १५ ऑगस्ट, १ मे तसेच मराठवाडयात १७ सप्टेंबर आणि इतर राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रिडा सामन्यांच्यावेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. अशा कार्यक्रमात प्लास्टिकेचे ध्वज वापरल्याने, कार्यक्रमानंतर फाटलेले कागदी तसेच प्लास्टिकचे ध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात, पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो.

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate :** **SHRI RAOSAHEB DADARAO DANVE**
**Shivaji Nagar, New Bhokardan, Tah. Bhokardan,**
**Dist. Jalna, Maharashtra**

**Name of political party :** **Bharatiya Janata Party**
**Name of Election :** **House of People (Lok Sabha Election - 2024)**
***Name of Constituency :** **18 - Jalna Parliamentary Constituency**

**I SHRI RAOSAHEB DADARAO DANVE,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of acts concerned and brief description of offences |
| 1. | Not Applicable | NC/587/2016 28/12/2016 | Not Applicable | Section 171(B) Indian Penal Code & Section 22(1) Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act 1965. As per Report gratification offered to voters to cast vote to a particular candidate. |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Pending Criminal cases | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of Court and date(s) of order(s) | Case No. and dated | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
| 1. | Not Applicable | Not Applicable | Not Applicable | Not Applicable |

Name & Signature of Candidate
**(SHRI RAOSAHEB DADARAO DANVE)**

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचं महाराष्ट्र गीत

कवी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ( इ.स.१८७१ ते इ.स. १९३४ ) यांनी सुप्रसिद्ध नाटककार आणि विनोदी निबंधकार म्हणून प्रसिद्धीस आले.याच नावलौकिकाने महाराष्ट्राला विशेष परिचित आहेत परंतु त्यांनी कविताही लिहिलेल्या आहेत. कल्पनारम्य नाट्यसृष्टीचे आणि आधुनिक विनोदी निबंधाचे ते जनक म्हणूनही ओळखले जातात. साहित्याचा टीकाकार कादंबरीकार आणि आत्मचरित्रकार म्हणूनही त्यांचा मराठी साहित्यामध्ये लौकिक प्राप्त केला आहे . मराठीच्या पाचव्या आणि इंग्रजी चौथ्या इयत्तेत असतानाच कोल्हटकरांनी किशोरवयातच नाटके लिहिली हे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते आहे.तसेच स्फुट काव्यें लिहिली... कोल्हटकरांनी हे सर्व ,' गीतोपायन ' या पुस्तकात सर्व कवितांना समाविष्ट करण्यात आले आहे. कोल्हटकर यांचा कवी म्हणून जो लौकिक आहे तो त्यांच्या सुप्रसिद्ध महाराष्ट्र गीतामुळे . या कवितेतून राष्ट्रभक्तीची आर्त साद अवघ्या मराठी मनाला कोल्हटकरांनी घातली असंच म्हणावं लागेल कारण महाराष्ट्र गीता सारखीच गीते अनेक कवींनी पुढे लिहिली आहेत.उदाहरणार्थ ,' महाराष्ट्र लक्ष्मी ' चे कवी विनायक ,' महाराष्ट्र महोदय ' ल.रा. पांगारकर यांनी लिहिले तर,' महाराष्ट्र भूपाळी 'व ,' महाराष्ट्र गीत ' दत्तोपंत तुळजापूरकर यांनी लिहिली आहेत.

' महाराष्ट्र गीत ' लिहून कवी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी राष्ट्रीय कवितेचा विशेषतः महाराष्ट्राचा , महाराष्ट्र गीतांचा नावलौकिक वाढविला. 'महाराष्ट्र गीत ' वरील अशा अनेक गीतांच्या तुलनेत कोल्हटकर यांचे महाराष्ट्र गीत अतिशय ओजस्वी असे संपन्न आणि सरस आहे असं म्हणता येतं. एका परीने कोल्हटकरांनी महाराष्ट्र,मराठी भाषा, मराठी गीत, मराठी संस्कृती मराठी अस्मिता जागृत करून,ती यशस्वी परंपरा रुजवली. त्यामुळे लोकांच्यात स्वाभिमानाची परंपरा नव्याने अर्थ बहाल करून दिली . शिववैभवाची जागृत मन राष्ट्र हिताचे विचार करण्यास सिद्ध झाली असं म्हणता येईल.राष्ट्रीय कवितेचं मूळं जशी भारतीय राजकीय संस्कृतीमध्ये पाहता येतात. तसेच मराठी राष्ट्रीय कवितेचे श्रेय सोहळाव्या शतकाचा महानायक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाला जाते. छत्रपतींनी केवळ मराठी मनात राष्ट्रीय अस्मिता जागृत केली नाही तर ती रुजविण्यासाठी एक अखंड परंपरा तयार केली. महाराष्ट्राला एक गौरवशाली इतिहास दिला, पारतंत्र्यामुळे खितपत पडलेल्या दुबळ्या मनात स्वातंत्र्याची आस निर्माण करुन राष्ट्रासाठी एकवटून लढण्याचं पाठबळ दिलं , जुलमी सत्तेपासून मुक्त केले . आत्मभान दिलं........ म्हणून महाराष्ट्र गीत अभिमानाने लोकांना भावले ! मराठी मनात गगनभेदी सुरांनी अवघ्या मुलुखात पसरले.देशाच्या सीमारेषा पार करून सातासमुद्रापार गेले.

मराठी राष्ट्रीय कवितेमध्ये अनेक मराठी कवींनी ही परंपरा पुढे चालवली.याचाच अर्थ कोल्हटकर यांनी राष्ट्रीय कवितेत नवीन पायंडा पाडला.म्हणजे कोल्हटकर कवितेच्या क्षेत्रात जरी अल्प कविता लिहिल्या गेलेल्या असल्या तरी या कवितेचं कवी कोल्हटकर यांनी दिलेली परंपरा, मूल्य मोठं आहे . ' गोतोपायन ' कोल्हटकर यांच्या स्फुट कवितांचा संग्रह आहे. बहुतांश कवितेमधून राष्ट्रीय अस्मिता रुजविण्यासाठी जनजागृती करण्यासाठी आपलीं लेखनी कवीने सिद्धहस्त केली आहे. .. प्रथम त्यांनी जी परंपरा निर्माण केली त्या ,' महाराष्ट्र गीत ' कवितेच्या संदर्भातील योगदान लक्षात घेतले की कवीच्या राष्ट्रीय कवितेचे गुणविशेष आकळतात.भुमिका समजून येते. आणि मराठी राष्ट्रीय कवितेच्या प्रांगणातील योगदानाबद्दल




तौलनिक लेखाजोखा मांडताना कवितेचे मूल्यही अधोरेखित होते.

मराठी परंपरा पूर्व वैभव पूर्वजांचा पराक्रम मराठी भाषा, मराठी बाणा आणि महाराष्ट्र धर्माचे मर्म सांगणारे अत्यंत उत्स्फूर्त आणि ओजस्वी असे हे गीत आहे या गीताची सुरुवात,पहा -

बहु असोत सुंदर संपन्न की महा
प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश- हा!

खरं तर कवींचा कार्यकाल पाहता या पार्श्वभूमीवर अभिमानाने सांगणं हे महत्त्वाचे कार्य आहे. स्वाभिमानी मनानं अहंकारी मनाला दिलेलं आवाहन आहे. पारतंत्र्यात ब्रिटिशांना ठणकावून सांगत आहेत... आशयसंपन्न काव्याची सुरुवात केवढ्या आत्मविश्वासाने होते आहे!!

.महाराष्ट्रीय मनाची आकांक्षा उत्तुंगतेने एवढी आहे की, गगणसुदधा ठेंगणं पडावं.इथलं देशप्रेम एवढं विशाल आहे की,कशाचीही तमा न बाळगता पारतंत्र्यातील तुरुंगात कितीही हाल अपेष्टा झाल्यातरी,काळ्या पाण्याची शिक्षा झाली तरी न डगमगता मातृप्रेमानं भारुन आपलं सामर्थ्य सिद्ध करतात. हा यशस्वी इतिहास व ही सामर्थ्यशाली गाथा देणारं राष्ट्र आहे. ही पारतंत्र्यात जाणीव करून देणे हे फार महत्त्वाचे होते ते अचूकपणे कवींनी सहजसाध्य केले आहे साध्य झाले आहे.

महाराष्ट्र ही संतांची व वीरांची भूमी आहे.. म्हणून त्याग जेवढा आहे तेवढेच सामर्थ्यशाली किर्तीचीही मिळविणारी भूमी आहे.धर्म आणि राजकारण यांचा मेळ घातला जातो नव्हे सत् धर्मानं राष्ट्र चालते.या ओळी आजही लागू पडतात.हा सूचक इशारा केला आहे की,धर्मानं, नीतिमूल्ये, न्यायप्रविष्ट असे राज्य चालायला हवे.शक्ती युक्तीची इथं जोड असल्याने ते अजिंक्य आहत. हे प्रत्येक मराठी माणसाने , राष्ट्र भक्तानां आत्मनिरीक्षण , परीक्षण करण्यासाठी भाग पाडते. याचाच अर्थ प्रत्येक राष्ट्रभक्ताने नव्हे नागरिकांनी याचं भान राखलं पाहिजे.ही सूचकता कोणत्याही काळातील अवस्थेतील जनतेला उपयुक्त आहेत. आहे...

विक्रम -वैराग्य एक जागि नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्ती-युक्ति एकवटुनी कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा !

थोडक्यात हे मराठीचे महाराष्ट्राचे अमस्तोत्र आहे.बहु असोत सुंदर संपन्न की महा ।

प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ।। धृ ।। असं वारंवार म्हणावे वाटते.कारण इथलां प्रासादच प्रत्येक मांणसांच्या देशभक्तीनं भारलेला, सदृढ मनाची व विचारशलाकेनं दिव्यत्वाची प्रचिती देणारी माणसं आहेत.

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें, सद्भावांचीच भव्य दिव्य आगरें , रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळी नुरे, रमणीची कूस जिथे नृमणिखनि ठरे, शुद्ध तिचे शीलहि उजळवि गृहा गृहा ।।

महाराष्ट्रातील वैचारिक क्रांतींनं व नैतिक अधिष्ठान लाभल्याने इथंला सैनिक अतुलनीय शौर्य करतो.त्याच्या शौर्यापुढं कुणाचाच टिकाव लागत नाही.म्हणून इथला सैनिक, मावळा बघताच धूम ठोकतात.

नग्न खड्ग करिं, उघडे बघुनि मावळे, चतुरंग चमूचेही शौर्य मावळे, दौडत चहुकडुनि जवें स्वार जेथले, भासत शतगुणित जरी असति एकले,

यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ।।

कवींनी पुन्हा एकदा १६ व्या शतकातील यशस्वी इतिहासाला जनतेच्या डोळ्यासमोर उभं करून पारतंत्र्याच्या विरोधात उभं राहून स्वातंत्र्य मिळविण्याची बळ दिले आहे.हा गौरवशाली इतिहास पुन्हा पुन्हा कविता, गीतातून आवळण्याची गरज आहे. जशी पारतंत्र्यातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणादायी होण्यासाठी तर स्वातंत्र्याला सुराज्य करण्याची अतिव गरज आहे. ....

गीत मराठ्यांचे श्रवणीं मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि जेथ अंतरी ठसो
वचनिं लेखनींहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्म मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणि ही असे स्पृहा।।

अशा पद्धतीने आपला राष्ट्राभिमान सदैव जागृत ठेवण्यासाठी,श्री.कृ.कोल्हटकरांनी प्रथम महाराष्ट्र गीत लिहिले आहे.व या गीताच्या आशयाच्या उपयुक्ततेनं मोलाचं राष्ट्र कार्य केले आहे.त्यांनी अनेक राष्ट्रीय स्फुट कविता लिहिल्या आहेत. यातून केवळ राष्ट्रीय अस्मिता रुजविण्यासाठी व स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय जनजागृती करणं हा मुख्य उद्देश सफल झाला आहे...

**प्रो.डॉ.सुवर्णा गुंड - चव्हाण**
**मराठी विभाग प्रमुख**
**माऊली महाविद्यालय वडाळा.उ.सोलापूर**

# आ. तान्हाजीराव मुटकुळे, रामदास पाटील यांची निरीक्षकपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**




लोकसभेच्या तिसऱ्या टप्प्याचा निवडणुक प्रचार सुरू असून या प्रचारासाठी हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील कागल विधानसभा मतदारसंघात निरीक्षकपदी तर हिंगोली लोकसभेचे प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर यांची लातूर लोकसभा मतदारसंघातील उद्गीर या विधानसभा मतदारसंघात निरीक्षकपदी निवड भारतीय जनता पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

हिंगोली लोकसभा निवडणुकीनंतर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटनात्मक नियुक्त्या केल्या आहेत. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील कागल विधानसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आ. मुटकुळे यांनी तत्काळ पक्षादेशाचे पालन करीत कोल्हापूर लोकस संघात प्रचाराची धुरा हाती घेतली असून त्यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष समरजीत घाटगे यांची त्यांच्या निवासस्थानी भेटही घेतली आहे. कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार संजय मंडलीक यांच्या प्रचारार्थ कागल येथील प्रचार सभेला हजेरी लावली आहे. हिंगोली लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर यांचीही लातूर लोकसभा मतदारसंघातील उद्गीर विधानसभा मतदारसंघाच्या निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांनीही लातूर, उद्गीर येथे जाऊन भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधून प्रचाराला सुरूवात केली आहे. रामदास पाटील सुमठाणकर यांनी महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्याा प्रचारार्थ संपूर्ण लोकसभा मतदारसंघात झंझावती प्रचार केला. त्यांच्या प्रचारा दरम्यान हिंगोली लोकसभा मतदारसंघात महायुतीची ताकद निश्चितच वाढली असून मतदान केंद्रापर्यत जाऊन भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बळ देण्याचे काम रामदास पाटील यांनी केले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

**हिंगोली, ३० एप्रिल-** येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्रातील एक आधुनिक संत, भक्त, कवी व समाजसुधारक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव सर हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्याहस्ते, मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मराठी व हिंदी भाषांमध्ये तुकडोजी महाराजांनी काव्यरचना केली. स्वातंत्र्य लढ्यात आणि राष्ट्रकार्यात ते सहभागी झाले. त्यांच्या कार्यामुळे ते राष्ट्रसंत बनले. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे मुख्य वैशिष्ट्य होते. असे विचार याप्रसंगी मांडण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक प्रा. अनिल शास्त्री, एमसीव्हीसी समन्वयक डॉ. संजय कयाल स्टाफ सचिव प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, स्टाफ सहसचिव प्रा. अरविंद गाडे, प्रा. डॉ. प्रदीप अचोले, प्रो. डॉ. शत्रुघ्न जाधव, प्रा. डॉ. आनंद भट्ट, प्रा. डॉ. विलास पवार, प्रा . डॉ. सचिन हाटकर, प्रा. डॉ. बस्वराज लक्षटे, प्रा . डॉ. शैला वाघ, प्रा. डॉ. महेश मंगनाळे, प्रा. मिनाक्षी जाधव, प्रा . पंडित कुराडे, प्रा. सुरेश वराड, प्रा. भानुदास राठोड, प्रा. राम तोडकर, प्रा. धनंजय जोशी, प्रा. निलेश उबाळे, प्रा. आनंदा बेले, प्रा. डॉ. सुखदेव बळखंडे, कैलाश डिडाळे, मिलिंद रांजणिकर, गजानन माने, अभिजित दादेगावकर, बालाजी घुगे, विजय पाठक, प्रवीण दुबे, संतोष बिडवाई, राहुल हराळ, चैतन्य इंगळे, जीवन मोरे, अनिल मुदिराज, संतोष लोणकर, रामसिंग पवार, दीपक कंठाळे, शेख जावेद, राजू राजकटलु, मंगल दिंडे, पुण्यरथा ढोंबरे, इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. अण्णाजी मडावी यांनी केले

## संक्षिप्त वृत्त

### पूजा भगतला नर्सीग अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य



हिंगोली- महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ नर्सिंग अँड पॅरामेडीकल एज्युकेशन, मुंबई अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ अंतर्गत घेण्यात आलेल्या ए.एन.एम (नर्सिंग) या दोन वर्षीय अभ्यासक्रमात आनंदीबाई बेंगाळ नर्सिंग स्कुल, कोळसा, ता.सेनगाव, जि. हिंगोली या संस्थेची विद्यार्थ्यांनी कु.पूजा दादाराव भगत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या बद्दल आनंदीबाई बेंगाळ नर्सिंग स्कुल च्यावतीने तिचे अभिनंदन करण्यात आले. योग्य मार्गदर्शन व प्रॅक्टिस हेच तिच्या यशाचे गणित आहे.

### आयएमए आरोग्य संस्थेच्या जिल्हाध्यक्षपदी डॉ. मनिष बगडीया यांची निवड

हिंगोली- येथील सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ तथा जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीष बगडिया यांची हिंगोली येथील ऍलोपॅथिक मेडिकल असोसिएशन (आय एम ए) च्या जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून त्यांनी या पदाचा कारभार महाराष्ट्र दिनानिमित्त एक मे पासून पदभार स्वीकारनार आहे.



पदभार स्वीकारल्यानंतर डॉ मनीष बगडिया यांनी असंख्य रुग्ण तपासणी व उपचार करत असताना डॉक्टरांना येणारे वेगवेगळ्या अडीअडचणी, बोगस डॉक्टर वर कारवाई करणे, डॉक्टरांमध्ये समन्वय साधने, सीएमई ऑर्गनाईज करणे, संघटना मजबूत करणे व वाढवणे या विषयावर काम करण्याचे आश्वासन दिले तसेच लवकरच डेंटल आयुर्वेदिक व होमिओपॅथिक संघटनेशी संपर्क साधून डॉक्टर असोसिएशनची स्थापना करून डॉक्टरांमध्ये समन्वय साधनेचे काम करण्याचे सांगितले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नितीन तडस व सर्व श्री डॉ दीपक मोरे, श्रीनिवास कंदी, तापडिया, संजीवन व शाम लखमावार, मुक्कलवार, टेहरे, शहा, तोष्णीवाल, नाकाडे, पवार, गुडेवार, बांगर, सलीम खान, शेळके, शिराळकर, इम्रान खान, ठाकरे, बगाटे, शिंदे, कोटकर, जारे, गीते, कोंडावार, रोडगे , बीडकर, चौधरी, धुमाळ जिरवणकर, कुराडे.. इतर संघटनेचे सर्व सदस्ययांनी त्यांचे अभिनंदन केले आहे व संघटन मजबूत करण्यासाठी काम करतील अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच डॉ. मनीष बगडिया यांनी ज्या असोसिएशनचे सदस्य ज्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला आहे त्यांचे आभार व्यक्त केली आहे.

### १९ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- पोलिसांनी १९ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही करीत ९ हजार ९५० रूपये दंड वसूल केला आहे.

# बाभूळगाव येथे महिलेस विषारी औषध पाजून मारण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

सेनगाव तालुक्यातील बाभूळगाव येथे दुसरे लग्न करण्यासाठी शपथ पत्रावर स्वाक्षरी देण्याच्या कारणावरून महिलेस विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीसह तिघांवर गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिगोली तालुक्यातील उमरा येथील क्रांती श्रीहरी वाबळे या विवाहीतेचा सासरची मंडळी छळ करीत होती. क्षुल्लक कारणावरून मारहाण केली जात होती. त्यानंतर दि ३१ जुलै २०२३ रोजी त्यांना घराच्या बाहेर काढून दिल्यामुळे त्या माहेरी बाभूळगाव येथे राहण्यासाठी गेल्या होत्या.

दरम्यान, त्यानंतरही त्यांचे पती श्रीहरी वाबळे व इतर दोघांनी दि २१ एप्रील रोजी बाभूळगाव येथे जाऊन त्यांना शिवीगाळ केली. मला दुसरे लग्न करायचे आहे त्यासाठी शपथ पत्रावर स्वाक्षरी दे असे म्हणत त्यांना मारहाण केली. आमच्यावर यापूर्वी केलेल्या केसेस मागे घेऊन दुसरे लग्न करण्यास परवानगी देण्यासाठी धमकी दिली. त्यानंतर श्रीहरी याने त्याच्या जवळ असलेली विषारी औषधाची बाटली त्यांना पाजवून जीव मारण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, अचानक झालेल्या प्रकारामुळे क्रांती ह्या घाबरून गेल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी नांदेड येथे खाजगी रूग्णालयात दाखल केले. त्यानंतर त्यांनी आज गोरेगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून श्रीहरी वाबळे याच्यासह अन्य दोघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि रवीकांत हुंडेकर हे करीत आहेत.

# सासुरवाडीला जातो म्हणून गेलेला बेपत्ता तरूण नांदेडमध्ये सापडला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

कळमनुरी तालुक्यातील सुकळीवीर येथील नवविवाहीत तरूण अखेर नांदेडमध्ये सापडला असून कुरूंदा पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेऊन दि ३० एप्रील रोजी पहाटे त्याच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील सुकळीवीर येथील नवविवाहीत तरूण प्रमोद मात्रे हे रविवारी दि २८ एप्रील रोजी सासुरवाडीला निघाले. परंतु सासुरवाडीला ते पोहचले नाही. त्यामुळे त्यांच्या वडील नागोराव मात्रे यांनी कुरूंदा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार केली. त्यावरून कुरूंदा पोलिस ठाण्यात नोंद घेण्यात आली. कुरूंदा पोलिस ठाण्याचे सपोनि रामदास निरदोडे, उपनिरीक्षक युवराज गवळी, जमादार बाभळे यांच्यासह सुकळीवीर येथील गावकऱ्यांनी मागील दोन दिवसांपासून सिंदगी परिसरातील जंगल पिंजून काढले तसेच परिसरातील विहीरी, व नाल्यांमध्ये त्याचा शोध घेतला. मात्र तो कुठेही सापडला नाही. विशेष म्हणजे त्याने वारंगा येथील एटीएम मधून पैसे काढल्याचेही स्पष्ट झाले. त्यामुळे पैशावरून काही अप्रीय घटना घडली नाही ना अशी भिती व्यक्त केल्या जात होती. या घटनेवर सायबर सेलचे पथकही लक्ष ठेवून होते. रात्रीच्याा सुमारास तो नांदेड येथे असल्याची माहीती मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तातडीने जाऊन त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर आज पहाटे प्रमोदला त्याच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले. तो पुणे येथे गेला होता त्यानंतर तो सोमवारी नांदेडला आल्याची माहीती सुत्रांनी दिली आहे.

# भाविमंच्या १९९८ च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० एप्रिल**

शहरातील भारतीय विद्या मंदिर शाळेतील सन १९९८ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. तब्बल २६ वर्षांनी वर्गमित्र पुन्हा एकदा एकत्र आले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा यथोचित सत्कारही करण्यात आला.

येथील भारतीय विद्या मंदिरात इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेऊन डॉक्टर्स, इंजिनीअर, न्यायधीश, वकील, गुत्तेदार, शिक्षक, शिक्षिका तसेच आयटी कंपन्यांमध्ये, शेतीमध्ये उत्कृष्टपणे काम करून जीवनात यशस्वी झाले आहेत. विशेष म्हणजे अमेरिकेतून केदार शेवाळकर हा माजी विद्यार्थी देखील स्नेहसंमेलनासाठी मुद्दामहून आला होता. या स्नहेसंमेलनात जवळपास १६० माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. शाळेच्या प्रांगणात सुंदर व्यासपीठ तयार करून त्यामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. तब्बल २६ वर्षानंतर वर्गमित्र एकमेकांना भेटणार याचा आनंद सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. शाळा, वर्ग, शाळेतील आठवणींना यावेळी विद्यार्थ्यांनी उजाळा दिला. सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी त्यांचा परिचय दिला. त्यामध्ये सुप्रसिध्द डॉक्टर्स, वकील, न्यायधीश, पायलट, इंजिनीअर, शेतकरी,



गुत्तेदार तसेच शिक्षक, शिक्षीका यांचा समावेश होता.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यामध्ये त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचे आणि शाळेचे आभार मानून गुरूजनांचा यथोचित सत्कार केला. सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ पी एस अंभोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून पी जी राके, एस एम निमोदीया, ए सी वाघमारे, एस डी होडबे, लोणकर, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, ए व्ही लोळेवार, दिलीप रोडे, व्ही जी नाव्हेकर, एस के पाशा, एस आर वाबळे, व्ही यु शिंदे, एस पी जाधव, एस पी कुलकर्णी, टी आर चिलमुल आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुख्याध्यापक अंभोरे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीनवाबद्दल त्यांचे अभिनंदन करीत विद्यार्थी जेंव्हा मोठ्या पदावर जातो तेव्हा शिक्षकाला सर्वात मोठे समाधान होते. या शाळेतून अनेक विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहचले आहेत. जीवनात संस्कार हे शालेय जीवनात घडत असतात तेच कायम राहतात. त्यामुळे प्रत्येकाचे जीवनात शालेय जीवनाला महत्व आहे. शालेय जीवनातील क्षण हे अविस्मरणीय असतात. विद्यार्थ्यांनी केलेल्या सत्काराबद्दल तसेच आयोजनाबद्दल त्यांनी आभार मानले.

त्यानंतर माजी विद्यार्थी-शिक्षक यांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. त्यानंतर विद्यार्थ्यांन मनोरंजनाचे कार्यक्रम सादर केले. संपूर्ण दिवसभर माजी विद्यार्थी शाळेच्या प्रांगणात मनमुराद आनंद लुटत असतांना दिसले.

यावेळी डॉ यशवंत पवार, डॉ आशिष झडपे, डॉ नागेश बांगर, डॉ राहुल सौंदनकर, तन्मय शाह, बलराम चौधरी, अमित केळे, अमित गोडबान, कुशल यंबल, विलास ठाकूर, प्रवीण मलीये, सिकंदर नौरंगाबादी, मुस्तफा नौरंगाबादी, जमीन बेनीवाले, प्रदीप भुक्तर, अमित कोंडेवार, आशिष हलगे, समीर गुंडेवार, स्वप्ना चामणीकर, संगीता कुलकर्णी, छाया भिसे, संजय बांगर, शिवशंकर जाधव, ज्योती सालमोटे, अरूणा राठोर, अनुराधा सोमाणी, दिपाली निमोदीया, गणपत कल्याणकर, विजय गोटे, घनशाम मुसळे, राजुसिंह ठाकूर, विठ्ठल रोकडे, अजय चौगुले, शेख रफीक शेख रहीम, सिकंदर तळवी, आश्विनी जेवळीकर, प्रितीका जैस्वाल, नितुलाल जैस्वाल, दिपमाला खणके, रेणुका वाबळे, वैशाली खिल्लारे, अर्चना लोंढे, मनीष वानखेडे, वैशाली धनमने, मनाली धनमने, कल्याणी कुलकर्णी, सपना जैस्वाल, मधु जैस्वाल, अल्पन दसरे, चंचला बांगर, सुनीता मुंढे, योगेश रोकडे, मंदार व्यवहारे, विद्याधर उचीत, विष्णू तरनगरे, अविनाश गीते, प्रवीण घुगे, सुरेंद्र गिरी, अभिजीत जामकर, सुजाता गायकवाड, विकास धाबे, प्रवीण डहाळे, कैलाश भारती, हरीश पुरोहीत, नर्सिंग पुरोहीत, नावा पारीख, अतुल अंबरकर, प्रीती कदम, सचिन हलगे, संजय कदम, प्रफुल्ल मुपकलवार, मयुर जैस्वाल, गजानन सावळे आदींची उपस्थिती होती.

# संक्षिप्त

## ना.दानवे यांच्या प्रचारार्थ भाजप कामगार मोर्चाची नियोजन बैठक



**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ भाजपा कामगार मोर्चा कार्यकारिणीची नियोजन बैठक सोमवारी ( ता. २९) भाजपा जिल्हा कार्यालयात संपन्न झाली.

जिल्हा सरचिटणीस सिद्धविनायक मुळे, अतिक खान, जिल्हा उपाध्यक्ष देवीदास देशमुख, यांनी कामगारांसाठी केंद्र आणि राज्य सरकारने राबवलेल्या योजनांची माहिती देऊन प्रत्येक लाभार्थ्यांना कमळ निशानी समोर मतदान करण्याबाबत वार्ड निहाय कॉर्नर बैठका घेण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले. बैठकीस कामगार आघाडी चे मराठवाड़ा प्रमुख जुनेद मिर्झा, जिल्हाध्यक्ष गोविंद आर्दड, शहराध्यक्ष माणिक फड़, संजय डोंगरे, सुदर्शन काळे, संजय अटोळे यांच्या सह पदाधिकारी व कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## निवडणूकीसाठी नियंत्रण कक्ष स्थापन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयात चोवीस तास नियंत्रण कक्षाची स्थापन करण्यात आली आहे. झेडपीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण हे या कक्षाचे नोडल अधिकारी आहेत. आदर्श आचारसंहिता, निवडणूक खर्च, मतदार यादी इत्यादींबाबत कक्षाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवून तक्रारींचे निराकरण केले जाते. नियंत्रण कक्ष चोवीस तास सुरु राहण्यासाठी १४ अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविली आहे.

## बसस्थानकातून चिमुकलीचे अपहरण; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह!

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथील बसस्थानकातून अवघ्या सात वर्षीय नेहा सुनिल शिंदे या चिमुकलीचे अपहरण झाल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर जालना जिल्हा पोलीस दलाच्या कारभारावर आणि कार्यक्षमतेवरही पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घनसावंगी तालुक्यातील बाणेगाव येथील सुशिला आसाराम शिंदे ही महिला गुरूवारी गावी जाण्यासाठी उशीर झाल्यामुळे जालना बसस्थानकात आपल्या चिमुकल्या नातीला घेवून झोपल्या असता पहाटे जालना बसस्थानकातून त्यांची नात नेहा या चिमुकलीचे एका अज्ञात चोरट्याने अपहरण केल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. बसस्थानकातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये एकजण सदरील चिमुकलीला खांद्यावर उचलून घेवून जात असतांनाचे चित्रित झाले असून या प्रकरणात सदर बाजार पोलीसात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एरवी जालना बसस्थानक हे चोरट्यांचा अड्डाच बनलेला असून दरदिवशी बसस्थानकातून प्रवाशांच्या पैशांची पाकिटे, महिलेच्या गळ्यातील दागिण तसेच प्रवाशांच्या बॅगेत असणाऱ्या मौलव्यान वस्तु चोरीला जाण्याचे प्रकार नित्याचेच असतांना आणि या बद्दल नागरीकांनी अनेकवेळा पोलीसांबद्दल जाहीर नाराजी व्यक्त करूनही बसस्थानका तील चोरीचे प्रकार थांबलेले नसतानाच आता तर थेट चिमुकलीचे अपहरण झाल्यामुळे सदर बाजार पोलीसांच्या कारभाराबद्दल प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. रात्री-बेरात्री तसेच अगदी दिवसाही जालना बसस्थानकात चोरट्यांचा खुलेआमपणे वावर असताना आणि अनेकवेळा बसस्थानकातील ड्युटीवर पोलीस कर्मचारी कार्यरत असतांनाही चोऱ्या झालेल्या आहेत आणि त्यासंदर्भातील विविध प्रकारचे गुन्हे सदर बाजार पोलीसात दाखल झालेले असतांनाही बहुतांशी गुन्ह्यांची उकल अजूनही पोलिसांना करता आलेली नाही. सध्या लग्नसराई तसेच निवडणुकीचे दिवस असल्यामुळे जालना बसस्थानकात प्रवाशांची नेहमीच वर्दळ असलेली दिसून येते आणि याचाच फायदा चोरटे उचलत असतांना पोलीस मात्र केवळ हातावर हात देवून बसल्याचे दिसून येत असल्यामुळे नागरीकांमध्ये पोलीसांच्या कार्यक्षमतेबद्दल संताप व्यक्त होऊ लागला आहे.

# चौथ्या स्तंभाचा आवाज दाबणाऱ्या गुंडावर कारवाई करा!

**तभा वृत्तसेवा**
**परतूर /प्रतिनिधी**

दैनिक जगमित्र चे संपादक संतोष विष्णू भुतेकर यांना रावसाहेब दानवे यांच्या बातम्या का छापतो म्हणून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी परतुर यांना परतुर पत्रकार संघाच्या वतीने निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून पत्रकार हे निष्पक्ष व निर्भीड पणे शासन प्रशासन व जनतेच्या मूलभूत प्रशश्ना च्या बाबतीत दिवस-रात्र काम करत असतो. सध्या निवडणुकीची धामधुम सुरु असताना दैनिक जगमित्र चे संपादक संतोष विष्णू भुतेकर रा. हिवर्डी यांना जालना लोकसभेचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या बातम्या का प्रकाशित करतोस. असे फोन वर शिवीगाळ केली व तुला घरी येऊन जीवे मारेल अशी धमकी शिवाजी जगन्नाथ गायकवाड याने दूरध्वनी वरून दिल्याने भुतेकर कुटुंबीय भयभीत झालेले आहे. सदरील प्रकरणाची ऑडिओ रेकॉर्ड नुसार पोलीस प्रशासनाने थातूर मातुर गुन्हा दाखल केला आहे. परंतु



उपविभागीय अधिकारी परतूर यांनी या प्रकरणाची दखल घेऊन गायकवाड या गुंडावर पत्रकार संरक्षण कायदे अंतर्गत गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करण्यात यावी. व जगमित्र चे संपादक विष्णू भुतेकर यांना त्वरित पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी निवेदन देताना परतुर येथील पत्रकार शामसुंदर चित्तोडा, सचिव सय्यद वाजेद, संतोष आखाडे, माणिक जयस्वाल, राहुल मुजमुले, शेषराव वायाळ आशिष धुमाळ, हनुमंत दवंडे, प्रभाकर प्रधान, दत्ता एकील-वाले, परमेश्वर बिलारे, रियाझ शेख व भाऊसाहेब पाटील मुके तारेख शेख, मुमताज अन्सारी आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

# स्थानिक गुन्हे शाखेचे कृष्णा तंगे, सचिन चौधरी यांना पोलिस महासंचालक पदक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

घनसावंगी तालुक्यातील जांबसमर्थ येथील मंदिरातील चोरी प्रकरणाचा उलगडा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे स्थानिक गुन्हे शाखेतील पोहेकॉ. कृष्णा तंगे, पोहेकॉ. सचिन चौधरी यांना पोलिस महासंचालकांचे पदक जाहीर झाले आहे. घनसावंगी तालुक्यातील जांबसमर्थ येथील समर्थांच्या मंदिरातून ४५० वर्षांपूर्वीच्या श्रीराम व इतर मूर्तींची चोरी झाली होती. हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलिस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी कसरत झाली. शिवाय हा प्रश्न अधिवेशनातही उपस्थित झाला होता. याप्रकरणाचा छडा लवकरात लवकर लावावा यासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला होता. शिवाय ग्रामस्थांनीही आक्रमक भूमिका घेतली होती. त्यामुळे जांब समर्थ येथील चोरीचा कठीण गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांसह एलसीबीच्या टीमने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यात कृष्णा तंगे, सचिन चौधरी यांची भूमिकाही





महत्त्वाची ठरली होती. मागील काही वर्षांपासून जिल्ह्यातील अत्यंत कठीण, क्लिष्ट गुंतागुंतीचे मोठेमोठे दरोडे, खून, लूटमारीचे, घरफोडीच्या अनेक गुन्ह्यांचा चिकाटीने व धाडसाने तपास करून आरोपींना अटक करण्याची कामगिरी या दोघांनी केली आहे. या सर्व कामगिरीची दखल घेत महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक पदक (मेडल) जाहीर झाले आहे. याबद्दल या दोन्ही कर्मचाऱ्यांचे पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सहकाऱ्यांमधून कौतूक करण्यात आले.

# स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; कंटेनरसह १ कोटी १० हजाराचा माल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक २७ रोजी स्थानिक गुन्हेशाखचे पोलिस निरिक्षक रामेश्वर खनाळ यांना गोपनिय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, महाराष्ट्र शासनाने राज्यात उत्पादन व विक्री साठी बंदी घातलेला गुटख्याने भरलेला कंटेनर क्र. एच. आर. ३८ बी १३२६ देऊळगाव राजा कडुन जालन्याचे दिशेने येणार असल्याची माहिती मिळाली होती.

यावरुन पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार यांचे सह मौजे गोंदेगाव शिवारातील जगदंबा ढाब्यासमोर जाऊन सदर कंटेनर वाहन क्रमांक एच. आर.३८-बी.१३२६ यास ताब्यात घेतले.



कंटेनर चालक नामे गफ्फारखान पिता सुलेमानखान वय ५० वर्ष रा. डूंगरपुर (१३) जि. पलवल (हरियाना राज्य) यास कंटेनर मधील असलेल्या मालाबाबत विचारपुस केली असता त्याने सांगितले की, मी इंदौर मध्यप्रदेश येथुन सदरचा माल गुटख्याने भरलेले विविध पोते भरुन हुबळी कर्नाटक येथे घेऊन जात आहे. सदर कंटेनरची पाहणी केली असता कंटेनर मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा राजनिवास पान मसाला व सुंगधीत जाफराणी जर्दा किंमती ५८,१०,७६० रुपयेचा व ४२,००,०००/- रपये किंमतीचे कंटेनर वाहन असा एकुण १,००,१०,७६०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. रामेश्वर खनाळ, पोलीस अंमलदार कृष्णा तंगे, सचिन चौधरी, रमेश राठोड, फुलचंद हजारे, भाउराव गायके, रुस्तुम जैवाळ, सचिन राऊत, चालक धम्मपाल सुरडकर यांनी कारवाई केलेली आहे. पोलीसांनी केलेल्या या धडाकेबाज कारवाईमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# विडोळी येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात भाविक मंत्रमुग्ध



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील विडोळी येथे महारुद्र मारुतीरायाच्या कृपेने ह.भ.प कथा व्यास कु. नयना दीदी नाशिककर यांच्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती कथेच्या सहाव्या दिवशी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए.जे. पाटील बोराडे, ज्येष्ठ नेते अंकुशराव अवचार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक कल्याणराव खरात, माजी सभापती संतोष वरकड ,नगरसेवक तथा शहर प्रमुख वैजनाथ बोराडे,शिवसेना तालुकाप्रमुख अजय आवचार,राष्ट्रवादी कार्याध्यक्ष योगेश पाटील आवचार, प्रभाकर जिजा देशमुख, पप्पू दायमा, ह.भ. प.अंशिराम महाराज इत्यादी मान्यवर व महाआरतीचे गावातील यजमान आणि पंचक्रोशीतील माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# केळणा नदीपात्रातून अवैधवाळू उपसा महसुल प्रशासनाच्या नियंत्रणाबाहेर

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद /प्रतिनिधी**

दि.१८/०३/२०२४च्या मध्य रात्री पथकाच्या समोरून अवैध वाळू चे टिप्पर जातात पथक काहीच करत नाही. पुर्व माहीती देउन सुद्धा पथक काहीच कारवाई करत नाही.महसुल प्रशासन व अवैध वाळु तस्कर यांचा काही लगा दोरा तर नाही ना असा सवाल आरदखेडा व वरखेडा येथील ग्रामस्थ करत आहे अवैध वाळु तस्करीमुळे लोकांना प्रचंड ध्वनी प्रदुषणाला सामोरे जावे लागत आहे वारंवार तक्रारी करूनही. महसुल प्रशासन निवळ बघ्याची भूमिका घेतअल्याचे स्थानिक लोकांच म्हणने आहे अवैध वाळू उपसा करण्यासाठी ट्रॅक्टरांचा टिप्परचा जे सी बी चा बेसुमार वापर केला जात आहे गाव-ातील लोक ह्या अवैध वाळु उपस्यामुळे त्रस्त झाले आहेत गाव-ातील लोकांनी अनेक तक्राररी करुन सुद्धा अवैध वाळू वाहतूक नियंत्रणात येत नाही अवैध वाळु वाहतूक की मुळे परिसरात धुळीचे लोट चे लोट उठत आहे व रात्री अपरात्री वाळु वाहतूकी मुळे ध्वनी प्रदुषणाचा त्रास गावातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत त्यामुळे गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकरता येत नाही . लाखो रुपयांचा महलसुल बुडत. असल्यामुळे प्रशासनाने लक्षघालायला हाव आहे .केळणा केळणा नदी पात्रातून असाच जर वाळु उपसा होत राहीला तर येणाऱ्या काळात पाणी टंचाई सारखी समस्या उध्वभावु शक्ते



नदीपात्रात हजारो ब्रास वाळू गड्डे पडले असुन जाफ्राबाद तहसीलदार मॅडम यांनी त्याचे पंचनामे करून करवाई करणे अपेक्षित होते परंतु अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही झालेल्या नुकसानीची भरपाई संबंधी अधिकारी व कर्मचाऱ्यांकडुन वसुल करालहवी होती यामध्ये आता जिल्हाधिकारी साहेबांना लक्ष घालण्याची गरज आहे.

# पूर्णा नदीपात्रातील कोल्हापुरी बंधाऱ्याचे काम रखडले

**तभा वृत्तसेवा**
**तळणी / प्रतिनिधी**

तळणीसह सपूर्ण वीस ते पच्चवीस गावाची जीवनदाईनी असणार्या पूर्णा नदी पात्रातील तीनही बंधार्याच्या अवस्था अत्यंत वाईट असल्याने या बंधार्याचा कुठलाच उपयोग ना शेती च्या सिचनासाठी ना पिण्याच्या पाण्यासाठी होत नसल्याने या बंधार्याचा उपयोग शेतकर्याना होत नाही पूर्णा नदीपात्रातील वाघाळा , तळणी , व देवठाणा उस्वद , येथील हे बंधारे बांधुन जवळपास अठ्ठाविस वर्षाचा कालावधी झाला आहे परतू गेल्या दहा ते पंधरा वर्षापासुन हे तीनही बंधारे नादुरुस्त असल्याने या बंधार्यात एक थेबं पाणी अडवल्या जात नाही सन २००६ च्या आलेल्या महापूरात देवठाणा . उस्वद , व वाघाळा येथील बंधार्याचा बाजुचा भराव वाहुन गेला नदी काठची जमीन शेतकर्याची खरडून गेली . पच्चविस वर्षापूर्वी सुध्दा या बंधार्याच्या बाबतीत शेतकर्यानी आवाज उठवला होता विस ते पचविस वर्षापूर्वी च्या त्याकडे दुर्लक्ष केले गेले. पूर्णा पाटी तळणी ईचा येथील बंधार्याचा भराव व शेतकर्याची जमीन खरडून जाऊन पाच ते सहा वर्षाचा कालावधी झाला या बंधार्याची उच्च पातळी बंधार्यात रुपांतर करण्यासाठी ची मागणी कित्येक दिवसापासुन शेतकरी वर्गातुन होत आहे. देवठाणा उस्वद येथील बंधार्याचे काम झाल्यावर सुध्दा परत नव्याने बाजुंची भिंत नव्याने केल्यावर सुद्धा त्याच्या बाजुचा भराव वाहुन गेला होता आज सद्यस्थितीत हे बंधारे नादुरुस्त अवस्थेतच आहेत .तळणी , कानडी , लिबंखेडा , हनवतखेडा , देवठाणा , उस्वद , इंचा, टाकळखोपा, वाघाळा , दुधा , सासखेडा , किर्ला , भुवन , वझर सरकटे, आदी गावाना या बंधार्याचा सरळ फायदा होतो .पावसाळ्यात विदर्भातुन येणारे पाणी हे सरळ येलदरी धरणात जाते शेतीच्या उपयोगासाठी जनावाराच्या पिण्याच्या पाण्यासाठी याचा उपयोग होऊ शकतो अनेक गावाच्या पाणीपुरवठा योजना या पूर्णा नदीपात्रातुनच चालतात .वाळू चोरांना बसेल चाप या तीनही बंधार्याचे उच्च पातळी बंधार्यात रूपातर झाले तर या बंधार्यात बारा महीने पाणी राहू शकते पर्यायाने वाळू चोरीला चाप बसेल सर्वात जास्त वाळू चोरी याच भागातुन होत असल्याने प्रशासनाची कायमची डोकेदुखी बंद होईल. या बंधार्याची उच्च पातळी बंधार्यात रूपांतर करावे म्हणुन किशोर खंदारे मित्रमंडळ व शेतकर्यानी तळणी मंठा रोडवर भव्य रास्ता रोको केला होता . शासनाने शेतकर्याच्या या समस्येची दखल घेऊन या तीनही बंधार्याची उच्च पातळी बंधार्यात रुपातर करण्यासाठी निधीची तरतूद करावी . कुठलीही डांगडूजी करून मलमपट्टी करून ठेकदाराचे पोट भरेल अशा उपाययोजना करू नये अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे ,मंठा व परतूर नदी पात्रातील बंधार्याचे रुपांतर उच्च पातळी बंधार्यात करण्यात यावे व त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी देवद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली

# मुलींना मोफत कराटे मार्शल आर्ट प्रशिक्षण देण्यात येणार



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३० एप्रिल शालेय मुलींसाठी युवतींसाठी मोफत कराटे मार्शल आर्ट चे प्रशिक्षण दि १ में ते १६ मे पर्यंत देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये बिडकीन चितेगाव, कांचनवाडी , नक्षत्रवाडी, सातारा परिसर, देवळाई , या भागामध्ये देण्यात येणार आहे ,हे प्रशिक्षण मिशन मार्शल आर्टस अँड वूशू कुंगफू स्पोर्ट्स कराटे असोसिएशन इंडिया संघटनेचे अध्यक्ष ग्रँडमास्टर पवन घुगे सचिव मास्टर प्रवीण घुगे, प्रशिक्षिका राधा घुगे, नंदा घुगे ऋतुजा रणवळकर, प्रशिक्षक ,राम बुधवंत, शाम बुधवंत, राम चौरे, गौरव टोकटे, यांच्या मार्गदर्शन खाली देण्यात येणार आहे अधिक माहितीसाठी संपर्क करणे या प्रशिक्षणामध्ये. मार्शल आर्टस मधील कराटे कुंगफू, वूशू,बॉक्सिंग ज्युडो, लाठी काठी,तशेच मार्शल आर्टस मधील विविध सेल्फ डिफेन्स टेक्निक संकट काळात स्वतःचा बचाव कसा करणे शिकवण्यात येणार आहेत, यासाठी मुलींनी युवतीनी. आपला इतर वेळ वाया न घालवता हे धाडसी प्रशिक्षण घेऊन. स्वतःचे रक्षण करण्यासाठी सक्षम बनण्यासाठी मार्शल आर्टस प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा तसेच पालकांनी सुद्धा हे प्रशिक्षण घेण्यासाठी आपल्या पाल्यासाठी पुढाकार घ्यावा . असे आव्हान ग्रॅण्डमास्टर पवन घुगे, प्रवीण घुगे,राधा घुगे नंदा घुगे,यांनी केले आहे.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : House of People (Loksabha Election) -2024**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | 39 - Beed Parliamentary Constituency | Pankaja Gopinath Munde | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | | | 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Pimpri S.C.C.No. 6635/ 2023 Dtd. 05.12.2023 Unready Board | IPC 188, 279 Disaster Management Act 51B, Epidemic Diseases Act 3 | NIL | NIL | NIL |
| 2. | | | Jt. C.J.J.D and J.M.F.C., Patoda S.C.C.NO. 1366/ 2022 Dtd.05.09.2022 Argument on Exhibited -unready | IPC 188, 269, 270 Disaster Management Act 51B | NIL | NIL | NIL |

Name of constituency : **39 - Beed Parliamentary Constituency**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President, Bharatiya Janata Party, Maharashtra**

## परळीत ब्राह्मण सभा आयोजित शानदार सोहळ्यात
# २१ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० एप्रिल**

धर्माचरणाचे संस्कार हे उपनयना सारख्या संस्कारातून होते. त्यामुळे आपले सोळा संस्कार हे धर्मसंमत आहेत. अध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या या संस्कारांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते. देव, देश आणि धर्म पालनाचे संस्कार यातून रुजवले जातात. धार्मिकदृष्या तर अनन्यसाधारण महत्त्व असलेले हे संस्कार सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे ठरतात असे प्रतिपादन प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांनी केले. ब्राह्मण बहुद्देशीय सभा आयोजित शानदार सोहळ्यात विविध ठिकाणच्या २१ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले.

ब्राह्मण समाजाची मध्यवर्ती संस्था असलेल्या ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने आयोजित ४ ४ वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा आज २९ मे रोजी शानदार व वैभवी स्वरूपात संपन्न झाला. शानदार सोहळ्यात २१ बटुंवर सामुदायिक उपनयन संस्कार करण्यात आले. संत –महंत, मान्यवर व समाज बांधवांची सोहळ्यासाठी मोठी उपस्थिती लाभली. गेल्या ४३ वर्षा पासून ब्राह्मण बहुद्देशीय सभा परळी वै.च्या वतीने अविरतपणे हा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा उपक्रम चालवला जातो. शानदार आयोजन, नियोजनबध्द सोहळा या वैशिष्ट्यामुळे हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सुप्रसिद्ध आहे. यावर्षीचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा सकाळी ११.१२ वा. दर्शन मंडप वैद्यनाथ मंदिर परळी वै. येथे ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चार व विधीपुर्वक संपन्न झाला. या सोहळ्याचे पौरोहित्य मनोहर देव जोशी व ब्रह्मवृंदांनी केले.या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या २१ बटूंवर उपनयन संस्कार करण्यात आले. या वेळी प्रसिद्ध भागवताचार्य,कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर यांचे अशिर्वचन झाले. त्याचबरोबर धर्मसंस्कार जीवनाचा पाया असुन हे संस्कार करणारा ब्राह्मण सभेचा उपक्रम अविरत ४४ वर्षांपासुन सुरु ठेवणे हे कौतुकास्पद असुन परळीतील सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्यात उपस्थित राहण्याच्या स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या या परंपरेत मला उपस्थित राहता आले हे आनंददायी असल्याची भावना खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी यावेळी व्यक्त केली. जि.प. गटनेते अजय मुंडे यांनीही या उपक्रमाला दरवर्षी उपस्थित राहत असतो अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

हा सोहळा अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.सकाळी मातृका पुजनानंतर सर्व बटूंची प्रभू वैद्यनाथ मंदिर येथे शोभायात्रा काढण्यात आली. सनई चौघडा, मंत्रोच्चार व समाज बांधवांची मोठी उपस्थिती यामुळे मंदिर परिसर दणाणून गेला होता. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध भागवताचार्य,कीर्तनकार भागवतमर्मज्ञ ह.भ.प. बाळुमहाराज उखळीकर , बीडच्या विद्यमान खा.डॉ.प्रीतमताई मुंडे, जि.प.गटनेते अजय मुंडे, वैद्यनाथ देवस्थानचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख, विश्वस्त राजेश देशमुख, डॉ. गुरुप्रसाद देशपांडे, भाजप जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, भाजप शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया,वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हा.चेअरमन रमेश कराड, दीनदयाळ बँकेंचे व्हा.चेअरमन ड.राजेश्वर देशमुख, संदीप लाहोटी, महेशअप्पा निर्मळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागर बजरंग सोनवणेंसह बालाघाटावर
## शेतकऱ्याच्या पोराला मतदानारूपी आशिर्वादाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० एप्रिल**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील गावांमध्ये जाऊन आ.संदीप क्षीरसागर व बजरंग सोनवणे यांनी लोकांच्या प्रत्यक्ष भेटीगेटी घेत शेतकर्याच्या पोराला मतदानरुपी आशिर्वाद द्या असे आवाहन करत प्रचार दौरा केला.

सोमवार (दि.२९) रोजी बीड तालुक्यातील वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, अंजनवती, वडवाडी/बोरखेड, महाजनवाडी, लोणी घाट, गोलंग्री, कानडी घाट, सुलतानपूर, घारगाव या बालाघाटावरील गावांमध्ये जाऊन गावकर्यांशी थेट संवाद साधत



आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रचार दौरा केला. यावेळी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हेही सोबत होते. आ.क्षीरसागर व बजरंग सोनवणे यांनी, गावकर्यांना एकदा तुमच्यातल्याच एका शेतकर्याच्या पोराला मतदानरूपी आशिर्वाद द्या आणि आपले प्रश्न जाणणारा आणि मांडणारा खासदार तुमच्याच आशिर्वादाने बीड जिल्ह्याला द्या असे नम्र आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ.संदीप क्षीरसागर हे बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी दररोज बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक भागात फिरत आहेत. दरम्यान सर्वसामान्य लोकांकडून बजरंग सोनवणे यांना प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळत चालला आहे.

# मराठा आरक्षणाला कधीही विरोध नाही;सामाजिक सौहार्द बिघडू देऊ नका

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० एप्रिल**

या राज्यात जे चाललंय त्यात माझा दोष काय? मी माझ्या समाजात जन्म घेतला हा माझा दोष नाही तर ती माझी शक्ती आहे. मी कधी मराठा आरक्षणाला विरोध केला नाही, की कधी कुणाच्या अंगावर माणसं घालण्याचा प्रयत्न केलेला नाही. लोकशाहीमध्ये मतदारांसमोर जावून विनम्रतेने त्यांना मतं मागणं हा माझा अधिकार असताना मराठा आरक्षण मागणीच्या मुद्यावरुन गावात आल्यानंतर महिला उमेदवाराच्या वाहनाला गराडा घालणे हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यात घडणे दुर्देवी आहे. छत्रपती शिवरायांनी महिलेचा आदर करायला आपल्याला शिकवलं आहे.

एखाद्या महिलेला अडवणं आणि घोषणाबाजी करून बोलू न देणं हे अठरापगड जातीच्या धर्माच्या लोकांना बरोबर घेवून



स्वराज्य स्थापन करणार्या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्राला शोभणारं नाही असं संयमी आणि मुद्देसूद उत्तर भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी प्रचारा दरम्यान बोलतांना दिलं.

पंकजाताई मुंडे यांनी आज माजलगाव तालुक्यातील मतदारांशी संवाद साधत गाठीभेटी घेतल्या. या दरम्यान काही जणांनी मराठा आरक्षणाची मागणी पुढे करत लऊळ, किट्टी आडगाव येथे पंकजाताई मुंडे यांच्या वाहनाचा ताफा रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र पंकजाताई मुंडे यांनी कोणावरही नाराज न होता, या प्रकारानंतरही उपस्थित सर्व समाजातील मतदारांसमोर जावून संयमाने आपली भूमिका विषद केली. मराठा आरक्षणाच्या मागणीला माझा आणि आमच्या कोणाचाच कधीही विरोध राहिलेला नाही हे सांगत पंकजाताईंनी यावेळी सर्व महापुरुषांच्या समर्थनार्थ घोषणा देत हे सर्व महापुरुष मिळून समाज असतो, त्या सर्वांच्या विचारांतून आपण पुढे वाटचाल करतो आहोत असे सांगितले.

# १ मे महाराष्ट्र दिन कृषी तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० एप्रिल**

महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि. १ मे २०२४ रोजी बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सकाळी ८ वाजता कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे.

याच बरोबर जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी ७.१५ वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी, बीड, त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी ७.०० वाजता संपन्न होणार असून दोन्हीही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान, बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ७.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परिपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० एप्रिल**

खंजिरी भजन' या प्रकारातून सामाजिक प्रबोधन करत ज्यांनी अंधश्रद्धा आणि जातीभेद निर्मूलनाचे कार्य केले.तसेच 'ग्राम गीता' या काव्यातून आत्मसंयमनाचे विचार मांडणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (माणिक बंडोजी इंगळे) यांची जयंती पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.३० एप्रिल २०२४ मंगळवार रोजी साजरी करण्यात आली.यानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक संजयराव विभूते यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजहितासाठी चंदनासारखे झिजले–प्रा.चंद्रकांत मुळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० एप्रिल**

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.




याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. चंद्रकांतजी मुळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, अंधश्रद्धा व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी तुकडोजी महाराजांनी भजनं आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करून समाजप्रबोधन केले. समाजप्रबोधनासाठी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देणा-या राष्ट्रसंतांचे अख्खे आयुष्य चंदनासारखे झिजले. त्यांच्या कार्याचे स्मरण सदैव ठेवणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा. मुळे यांनी केले.कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा. उमेशजी जगताप मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी, पर्यवेक्षक श्री दत्तात्रय तांबारे, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर व इतर शिक्षक सहकारी गण उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांना बहिणीला पाडण्याची घाई झाल्याचे त्यांच्या भाषणातून जाणवते–बजरंग बप्पा सोनवणे

**तभा वृत्तसेवा**
**आष्टी दि.३० एप्रिल**

मागील पंधरा दिवसापासून मी पालकमंत्र्यांना जरा सबुरीने घ्या असा सल्ला देतोय पण ते काही ऐकत नाहीत ते रोज आपल्या बहिणीच्या अडचणी वाढवणारी वक्तव्य करत आहेत एकूणच त्यांची सगळी धावपळ बहिणीचा पराभव करण्यासाठीच आहे कि काय असा प्रश्न प्रकर्षाने जाणवू लागला असल्याचे मत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातील आपल्या प्रचार सभेदरम्यान व्यक्त केले



लोक ऐकत नाहीत अस म्हणणाऱ्या सरपंचानी लोकप्रतिनिधींच्या दारात जाऊ नये असे वादग्रस्त वक्तव्य पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केल्यानंतर या वक्तव्यावरून त्यांच्यावर टीकेची झोड उठली असून सरपंच संघटनाही यावरून आक्रमक झाल्याचे दिसत आहेत आता त्यांच्या याच वक्तव्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनीही त्यांना घेरले आहे

सोनवणे यावर बोलताना म्हणाले कि ; निवडणुकीत टोकाची व व्यक्तिगत टीका होणार नाही याची दक्षता घ्या थोड सबुरीने घ्या असा मैत्रीचा सल्ला आपण पालकमंत्र्यांना दिला पण ते काहीकेल्या थांबताना दिसत नाहीत रोज नवनवीन आरोप करत आहेत त्यात ते स्वतःचा नाकर्तेपणा देखील अधोरेखित करत आहेत हेच काय कमी होते कि काय त्यात त्यांनी कालच्या सरपंचाच्या बाबतीत वक्तव्य करून बहिणीच्या अडचणी वाढवण्याचेच काम करत आहेत त्यामुळे त्यांना आपल्या बहिणीला पडण्याची घाई झाली आहे कि काय असे वाटू लागले आहे . त्यांचा पराभव हि जनता करणारच आहे त्यासाठी चार जूनची वाट तरी बघा असा टोमणा देखील मारला आहे

# सरपंचांना दारात येवू नका म्हणणाऱ्या पालकमंत्र्यांना जनतेला मते मागण्याचा नैतिक अधिकार नाही – बजरंग बप्पा सोनवणे

### हा वाढता अस्वस्थपणा कशाचे धोतक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० एप्रिल**

लोक काही ऐकेनात अस म्हणणाऱ्या सरपंचांनी यापुढे गावच्या विकास कामासाठी लोकप्रतिनिधींच्या दारात येवू नये असे वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या पालक मंत्री आणि त्यांच्या उमेदवारांनी आता मते मागण्यासाठी जनतेच्या दारात जाण्याचा नैतिक अधिकार गमावला असल्याची टीका महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातील ब्रम्हागाव येथे केला

आष्टी तालुक्यातील ब्रह्मगाव येथे श्रंगेश्वरी देवीची आरती केल्या नंतर गावकऱ्यांनी गावातून सजवलेल्या बैलगाडीतून तुताऱ्या वाजवीत ढोल ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढली. तसेच बजरंग बप्पा यांना कार्यकर्त्यांनी खांद्यावर उचलून घेतले.

यावेळी बोलताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, पालकमंत्र्यांनी सभेत बोलताना म्हटले होते की, जर गाव सरपंचाचे ऐकत नाही तर मग सरपंचानी कामासाठी त्यांच्या आमदारांच्या दारात जावू नये. असे वादग्रस्त विधान केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या याच वक्तव्याचा समाचार घेताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, पालकमंत्री अशा पद्धतीने बोलत असतील तर त्यांना मते मागण्यासाठी लोकांच्या दारात जाण्याचा नौतिक अधिकार नाही. त्यांचे हे वक्तव्य लोकशाहीचा गळा घोटणारे आहे . यातून ते हताश झाल्याचे दिसते असा टोलाही त्यांनी लगावला .

माझ्या जातीचे प्रमाणपत्र भर सभेत दाखवता आता पर्यंत आम्हाला या कुणबी जातीच्या सवलतीपासून वंचित ठेवले आणि आता आम्ही प्रमाणपत्र काढले तर पालकमंत्री आणि उमेदवाराच्या पोटात का दुखते . मला आदरणीय मनोज दादा जरांगे पाटील यांच्या लढ्यामुळेच जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्याचा त्यांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला. हे सरकार शेतकरी विरोधी असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणा करणाऱ्या सरकारने शेतीसाठी आवश्यक वस्तूंच्या किमती चौपट करून त्यांच्या आयुष्याशी खेळ चालवला असल्याचा गंभीर आरोप यावेळी केला.तसेच जिल्ह्याच्या जिव्हाळ्याच्या रेल्वेप्रश्नावर बोलताना ते म्हणाले कि आपण निवडून गेल्यानंतर दोनच वर्षात रेल्वे परळीपर्यंत नेहून दाखवू व जिल्हावासियांची स्वप्नपूर्ती करू असे स्पष्ट आश्वासन त्यांनी यावेळी दिले तर तरुणांचा रोजगाराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रत्येक तालुक्यात प्रकल्प उभारू व त्यांच्या हाताला काम देऊ असेही ते म्हणाले.यावेळी बजरंग बप्पा यांच्या सोबत माजी आमदार साहेबराव नाना दरेकर, राम खाडे, डॉ. विलास सोनवणे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते.

# योगेश्वरीत आजपासून महिलाआत्मभान प्रशिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० एप्रिल**

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने ०१ मे ते ०८ मे पर्यंत चालणाऱ्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन ०१ मे रोजी श्रीमती गो कु यो कन्या विद्यालयात होत असून अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे असून उद्घाटक म्हणून अबाजोगाईच्या अतिरिक्त पोलीस अधिक्षक चेतना तिडके तर विशेष निमंत्रित संस्थेच्या माजी विद्यार्थिनी व राष्ट्रीय हॉकीपटू श्रेया पवार आदी उपस्थित राहणार आहेत. या शिबीरात गुरुवार ०२ मे रोजी कोल्हापुर जिल्हयातील कुरूंदवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब नदाफ हे 'सावित्रीच्या लेकींनो पुढे-पुढे जाऊ' या विषयावर बोलणार आहेत शुक्रवार ०३ मे रोजी पुणे येथील सामाजिक कार्यकर्त्या निलम पंडीत ह्या भारतीय संविधान व महिलांचे अधिकार या विषयी मनोगत व्यक्त करतील पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते संदीप बर्वे हेसंविधान भान याविषयी भावना व्यक्त करतील शनिवार०४ मे रोजी छत्रपती संभाजीनगरच्या समिता जाधव ह्या 'मुली आणि समाज-माध्यमे' या विषयी बोलणार आहेत तर रविवार ०५ मे ला नागपुरच्या सामाजिक कार्यकर्त्या विजया मारोतकर ह्या 'पोरी जरा जपून याविषयी तर सोमवार ०६ मे बीड जिल्हयाच्या शिरूर येथील सामाजिक कार्यकर्त्या मयुरी राजहंस ह्या 'मुलींचे समाजभान' या विषयी तर ०७ मे रोजी जालन्याच्या पोलिस निरीक्षक प्रणिता गायकवाड 'स्वसंरक्षण' या विषयावर मत व्यक्त करणार आहेत ०८ मे रोजी शिबीराचा समारोप सहयाद्री वाहिनीच्या वृत्त निवेदिका ज्योती अंबेकर तसेच योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ सुरेश खुरसाळे यांच्या उपस्थितीत होईल. या सर्व कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शिबीर प्रमुख तथा यो.शि.संस्थेचे संचालक भीमाशंकर शेटे,यो.शि. संस्थेचे उपाध्यक्ष जी. बी.व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष ड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेष वैद्य,संचालिका प्रा.डॉ. जयश्री देशपांडे,ड. कल्याणी विर्धे,प्राचार्य पी.आर.थारकर, समन्वयक प्रा.प्रविण भोसले यांच्या वतीने करण्यात आले आहे.